भविष्य निर्वाह निधी योजना व राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या वर्गणीदारांची वेतन देयके "सेवार्थ" प्रणालीत स्वतंत्र गट/संचाद्वारे संस्करीत करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.५६/कोषा प्रशा-४**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक:- ९ डिसेंबर, २०२०**

**<u>प्रस्तावना</u>**

सद्य:स्थितीत भविष्य निर्वाह निधी लागू असलेले वर्गणीदार (अधिकारी व कर्मचारी) आणि राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेले वर्गणीदार (अधिकारी व कर्मचारी) यांची वेतन देयके "सेवार्थ" प्रणालीतून एकत्रित संस्करीत करण्यात येतात. तथापि, त्यामुळे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या वर्गणीदारांचे अंशदान तसेच शासन अंशदानाची रक्कम विहित कालावधीत वर्गणीदाराच्या "प्रान" खात्यावर जमा होण्यास अडचणी येत असल्याचे दिसून येते.

२. सबब, राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या वर्गणीदाराचे अंशदान तसेच शासन अंशदानाची रक्कम विहित वेळेवर जमा होण्याच्या दृष्टीने, "सेवार्थ" प्रणालीत भविष्य निर्वाह निधी योजनेतील वर्गणीदार आणि राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनांतर्गत वर्गणीदार यांच्या वेतन देयकांचे स्वतंत्र गट/संच (Bill Group) बनवून त्यांचे वेतन आहरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्याअनुषंगाने सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना खालील सूचना देण्यात येत आहेत.

## शासन परिपत्रक

१) सद्य:स्थितीत "सेवार्थ" प्रणालीमध्ये भविष्य निर्वाह निधी योजना, राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना तसेच या दोन्हींपैकी कोणतीही योजना अद्यापही लागू नसलेले इतर कर्मचारी यांची वेतन देयके एकत्रितपणे संस्करीत करण्याची सुविधा आहे. यापुढे आहरण व संवितरण अधिकारी यांनी वेतन आहरीत करताना खाली नमूद "अ" ते "क" नुसार वेतन देयकांचे स्वतंत्र संच/गट (Bill Group) तयार करावेत. सर्व अधिकारी व कर्मचारी त्यांच्याशी संबंधित देयक संच/गटामध्ये समाविष्ट झाल्याची आहरण व संवितरण अधिकारी यांनी खात्री करावी.

अ) भविष्य निर्वाह निधी लागू असलेले अधिकारी व कर्मचारी,
ब) राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेले अधिकारी व कर्मचारी,
क) इतर कर्मचारी ज्यांना उपरोक्त दोन्हीपैकी कोणतीही योजना अद्याप लागू केलेली नाही.

२) उपरोक्त प्रमाणे स्वतंत्र देयक संच/गट "सेवार्थ" मधील "Bill Group Maintenance" या टॅबमधून तयार करावेत व सदर देयक संच/गट यामध्ये संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना जोडण्यात यावे.

३) राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा "प्रान" क्रमांक प्राप्त झाल्यानंतरच त्यांना "NPS देयक संच/गट" यामध्ये समाविष्ट करण्यात यावे. तसेच ज्या कर्मचाऱ्यांना "प्रान" क्रमांक प्राप्त झाले नाहीत अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयाशी संपर्क साधून त्वरीत "प्रान" प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी.

४) राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या अकार्यरत (Inactive) "प्रान" क्रमाकांची यादी मे.एन.एस.डी.एल. यांचेकडून जिल्हा कोषागार कार्यालयांना दरमहा पाठविली जाते. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी अकार्यरत "प्रान" क्रमांक असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी वरचेवर कोषागार कार्यालयांकडून प्राप्त करुन ते "कार्यरत" (active) करुन घ्यावेत व तदनंतरच अशा वर्गणीदाराचा वेतन देयकाच्या "NPS संच/गट" यामध्ये समावेश करावा.

५) भविष्य निर्वाह निधी योजना, राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना व गटविमा योजना लागू नसलेल्या कर्मचाऱ्यांना "स्वतंत्र देयक संच/गट" यामध्ये समाविष्ट करुन त्यांचे वेतन देयक "सेवार्थ" प्रणालीतून संस्करीत करावेत.

६) आहरण व संवितरण अधिकारी यांनी कोषागारात वेतन देयके सादर करताना सदर वेतन देयक भविष्य निर्वाह निधी योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना / इतर कर्मचाऱ्यांचे आहे हे त्या देयकावर स्पष्टपणे नमूद करावे.

**२.** उपरोक्तप्रमाणे सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी स्वंतत्र देयक संच/गट करण्याची कार्यवाही डिसेंबर, २०२० ते फेब्रुवारी, २०२१ या दरम्यान पूर्ण करावी. माहे मार्च, २०२१ (देय माहे एप्रिल,२०२१) चे उपरोक्तप्रमाणे स्वतंत्र संच/गट यामध्ये वर्गीकृत न केलेली वेतन देयके अधिदान व लेखा कार्यालय/कोषागार कार्यालयांमध्ये स्विकारण्यात येणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**३.** सदर शासन परिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२०१२०९१२०५२९४९०५ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ashok Gulab Chaudhary

Digitally signed by Ashok Gulab Chaudhary
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=92dfcb36eb3e19a8b418253e74d5703e6259839ca647379da27173dd25272748, serialNumber=3e9fa04602558ff79ec2fcb3553e7da28d75751faa9aa5aa2261d3e69f011558, cn=Ashok Gulab Chaudhary
Date: 2020.12.09 12:08:25 +05'30'

**( अशोक चौधरी )**
**कक्ष अधिकारी, वित्त विभाग**

**प्रत,**

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
२. सर्व मा. विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य
३. मा. राज्यपाल यांचे सचिव
४. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव

६. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
८. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
९. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई
१५. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१९. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२१. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२३. सर्व विभागीय आयुक्त
२४. सर्व जिल्हाधिकारी
२५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२७. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकणभवन, नवी मुंबई
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२९. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३०. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३१. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३२. निवड नस्ती/कोषा प्रशा-४

**अनुकंपा नियुक्तीचे धोरण गट-अ व गट-ब मधील शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : अकंपा -१२२१/प्र.क्र.११२/का-८**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ सप्टेंबर, २०२१.

**वाचा :-** शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा -१२१७/प्र.क्र.१०२/का-८, दि.२१.०९.२०१७

**प्रस्तावना :**

संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे अनुकंपा नियुक्ती धोरणातील सर्व तरतूदींचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. प्रचलित अनुकंपा नियुक्ती धोरणानुसार गट-क व गट-ड मधील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवेत असताना निधन झाल्यास त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्यास गट-क व गट-ड मधील पदावर अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्ती देण्यात येते.

अनुकंपा नियुक्तीचे मुख्य प्रयोजन हे, “शासकीय सेवेत असताना कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढवणाऱ्या आर्थिक आपत्तीतून कुटुंबास बाहेर काढण्यासाठी आणि या आपत्तीजनक परिस्थितीवर मात करण्यास मदत करण्यासाठी संबंधित मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील एका पात्र सदस्यास शासकीय सेवेत अनुकंपा (सहानुभूती) म्हणून नियुक्ती देणे” असे आहे.

उपरोक्त प्रयोजन तसेच कोविडची पार्श्वभूमी विचारात घेता, गट-क व गट-ड मधील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच गट-अ व गट-ब मधील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना देखिल ही योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

दिनांक २६ ऑगस्ट,२०२१ रोजीच्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

अ) गट-क व ड मधील शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे, अनुकंपा तत्वावर नियुक्तीचे धोरण, गट-अ आणि ब मधील शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येत आहे. त्यानुसार शासकीय सेवेत असताना गट-अ व गट-ब मधील दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पात्र सदस्यास गट-क व गट-ड मध्ये अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय करण्यात येत आहे.

ब) कोविडच्या पार्श्वभूमीवर सदर योजनेचा लाभ हा दिनांक १ जानेवारी,२०२० पासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०९२७१६५६०३९५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee52994443a8509075101cc93, serialNumber=92d474843b842720200d1a10946d5fc9348b9450f867605a47d177207c9bd384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2021.09.27 16:58:42 +05'30'

**( गीता कुलकर्णी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, मलबार हिल मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. सर्व सन्माननीय विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य.
५. मा. मुख्य सचिव
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व राज्य शासकीय कार्यालयांना संबंधित प्रशासकीय विभागामार्फत)
७. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
८. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
९. निवड नस्ती. (कार्यासन-८)

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
## राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

Web : www.jdhekop.org, E-mail: est.jdhekop@gmail.com,

फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्रं.विससं/उशि/कोवि/आस्था/वारसा हक्क नेमणूक/२०२१/ 4808 दि. 17 SEP 2021

वाचा -

१. सामन्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६-ब दि.१.१०.२००३
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र.सफाई-२०११/प्र.क्र.३२७/विघयो-२ दि.२१.१०.२०११
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र.सफाई-२०१४/प्र.क्र.०७/महामंडळे दि.२६.०२.२०१६
४. श्री. सुरज वाघेला यांचा दि. ४.११.२०२० रोजीचा अर्ज
५. राजाराम महाविद्यालय, कोल्हापूरचे पत्र क्र.रामको/आस्था-२/२०२१/१३४९ दि. ८.१२.२०२०
६. संचालनालयाचे पत्र क्र.२५२१ लापास/प्र.क्र./प्रशा-२/५७०३ दि. २५.३.२०२१

### नियुक्ती आदेश

उपरोक्त क्र.१ ते ३ मधील परिपत्रकान्वये शासकीय कार्यालयातील सफाई कामगार म्हणून काम केलेल्या कर्मचा-यांचे वारसांना वारसा हक्काने नोकरीत समावून घेणेच्या सुचना दिलेल्या आहेत. या अनुषगांने कै. अशोक भिमराव वाघेला, त्यांचे वारस मुलगा श्री. सुरज अशोक वाघेला, यांना वारसा हक्काने सामावून घेणेबाबत उपरोक्त क्र. ४ च्या अर्जान्वये विनती केली आहे. वरील बाबींचा विचार करुन नियुक्ती प्राधिकारी तथा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर या नात्याने प्राप्त असले अधिकाराचा वापर करुन श्री. सुरज अशोक वाघेला, यांना त्यांच्या नावासमोर दर्शिविलेल्या ठिकाणी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर कार्यालय हे गट-ड संवर्गातील प्रयोगशाळा परिचर, या पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीचे आदेश निर्गमीत करीत आहेत.

| अ.क्र. | सफाई कामगार म्हणून काम केले कर्मचा-याचे नांव | मृत्यू दिंनाक | उमेदवाराचे पूर्ण नांव व पत्ता व सेवानिवृत्त/मृत कर्मचा-यांशी नाते | नेमणूक दिलेले ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कै. अशोक भिमराव वाघेला, मु. पो. सांगाव नाका, ता. कागल, जिल्हा. कोल्हापूर | २०.९.२०२० | श्री. सुरज अशोक वाघेला, मु. पो. सांगाव नाका, ता. कागल, जिल्हा. कोल्हापूर (मुलगा) | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर |

<u>उपरोक्त उमेदवारांची नेमणूक ही खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.</u>

१. सदरची नेमणूक अगदी तात्पुरत्या स्वरुपात आणि हंगामी असून न्यायालयीन, प्रशासकीय इत्यादी कारणाने कोणतीही सूचना न देता रद्द केली जाईल.

२. नेमणूकीचे पदी हजर झाल्यानंतर संबंधीतास वैद्यकीय तपासणीसाठी जिल्हाशल्य चिकित्सक यांचेकडे पाठविणेत येईल व वैद्यकीय तपासणीअंती अपात्र ठरविल्यास त्यांच्या सेवा आपोआप संपुष्टात येतील.

३. नेमणूक केलेल्या पदावर हजर होण्यापूर्वी त्यांना शैक्षणिक अर्हतेसंबंधीची मूळ प्रमाणपत्रे तसेच मागासवर्गीय असल्याबाबतची मूळ प्रमाणपत्रे सादर कराची लागतील.

४. उमेदवराची नियुक्ती ही त्यांनी शैक्षणिक अर्हतेबाबतचे मूळ दाखले तसेच दोन मान्यवर व्यक्तीचे त्यांच्या वर्तणूकीसंबधी दाखले आणि सबंधित जिल्हयाच्या जिल्हा पोलीस प्रमुखांचा त्यांचा पूर्व इतिहास व वर्तणूकीसंबंधीचा दाखला सादर करण्याच्या अटीवर अवलंबून आहे.

५. उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा नियमावलीतील सध्या प्रचलीत नियम व वेळोवेळी निर्गमित होणारे शासकीय नियम लागू रहातील.

६. उमेदवाराची पती/पत्नी हयात असतांना दुसरा विवाह करता येणार नाही. तसे आढळल्यास तात्काळ सेवा समाप्त करण्यात येतील.

७. उमेदवार जर खाजगी अथवा शासकीय सेवेत असेल तर त्यांनी प्रस्तुत सेवेत रुजू होण्यापूर्वी त्या सेवेचा यथास्थिती राजीनामा देणे अथवा त्यापदावरुन कार्यमुक्त होणे आवश्यक आहे.

८. उमेदवारास जर शासकीय सेवेचा राजीनामा दयावयाचा झाल्यास तीन महिन्याची आगावू नोटीस देणे आवश्यक आहे. अथवा एक महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम शासकीय कोषागारात भरणा केली पाहिजे.

९. शासनाने विहित केलेले नेमणूकीबाबतचे नियम त्यांच्यावर बंधनकारक राहतील.

१०. उमेदवारास या कार्यालयाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणत्याही परीक्षेला बसता येणार नाही अगर शैक्षणिक अर्हता वाढविता येणार नाही.

११. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२.१२.२०११ अन्वये उमेदवाराने नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबधित जात **"जात पडताळणी समितीकडून "** प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहित मुदतीत जात पडताळणी प्रमाणपत्र कार्यालयास उपलब्ध करुन दिले नाही. तर उक्त कालावधी संपताच त्यांची सदर पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येतील.

१२. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अनियो/२००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१.१०.२००५ नुसार नव्याने नियुक्त होणा-या उमेदवारांना **"नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना"** लागू ठरेल.

१३. उमेदवारांने या नियुक्ती ओदशाच्या १५ दिवसांचे आत नेमणूकीच्या पदावर रुजू व्हावे. काही अपरिहार्य कारणास्तव सदर मुदतीत रुजू होणे शक्य नसल्यास तसे कळवून मुदतवाढ आगावू मंजूर करुन घेतली पाहिजे. वरील मुदतीत त्यांनी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर या कार्यालयास काहीही कळविले नाही. तर त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांचा नियुक्ती आदेश रद्द करण्यात येईल.

१४. त्यांना नेमणूकीच्या पदावर हजर होतांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भत्ते/खर्च देय राहणार नाहीत.

१५. यापुढे लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नेमणूकीसाठी या नियुक्ती आदेशाचा आधार घेता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१६. उमेदवाराने रुजू होण्यापूर्वी भारतीय घटनेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली पाहिजे.

१७. वरील सर्व अटींचे अनुपालन करणेची लेखी हमीपत्र रु.१००/- रुजू होतेवेळी सबंधीत कार्यालयात सादर करणे.

Kaune

विभागीय सहसंचालक,<br>(उच्च शिक्षण)<br>कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

प्रति,<br>श्री. सुरज अशोक वाघेला, मु. पो. सांगाव नाका, ता. कागल, जिल्हा. कोल्हापूर,

प्रत - मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव -

१) मा.प्राचार्य, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर

२/- सदर उमेदवार हजर होताना त्यांच्याकडून आदेशात नुमूद केलेल्या सर्व कागदपत्राची पुर्तता करुन घेवून नंतरच हजर करुन घ्यावे. तसेच सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे मुळ प्रतीवरुन तपासण्यात यावीत. तसेच सर्व कागदपत्रांची एक छायांकित स्वतः साक्षांकित करुन त्याची प्रत या कार्यालयास सादर करावेत. त्याच प्रमाणे मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत जात वैधता पडताळणी बाबत उमेदवारांनी सादर केलेली कागदपत्रे जात पडताळणी समितीकडे पाठविण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालय प्रमुखाची राहील.

२) आस्थापना व लेखा विभाग, प्रस्तुत कार्यालय

३) मा. कोषागार अधिकारी, कोल्हापूर

**शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय/ संस्था आणि शासकीय अध्यापक महाविद्यालये यामधील सहाय्यक प्राध्यापकांची कॅस योजनेंतर्गत सहयोगी प्राध्यापक वेतनश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आप्रयो-२०१८/(१६०/१८)/मशि १**
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनाक : २९ डिसेंबर, २०२०

<u>वाचा :-</u>

१. विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. एफ ३.१/२००९ दि. ३०.६.२०१०
२. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण २०११ (२५/११) विशि १ दि. १५.२.२०११
३. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. एनजीसी २००९/(२४३/०९)/विशि-१,दि.१२.८.२००९.
४. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. युएसजी १२९८/३४०२६/(४७१२)/विशि-४ दि.०६.०३.१९९९.
५. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. एनजीसी § १२९८ /(४६१९)/विशि-४ दि.११.१२.१९९९.
६. विद्यापीठ अनुदान आयोगाचे क्र. १-२/२००९(EC/PS)Pt. VIII दि. ७.१२.२०१२
७. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. एससीपी -२०१३/(१९२/१३)/मशि-१,दि. ५.८.२०१३.
८. शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१३/(प्रक. ४२०/१३) मशि १, दि. ३१.१.२०१५
९. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. आप्रयो २०१८/(१६०/१८)/मशि-१,दि. २२.११.२०१८
१०. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०१८/टे.क्र. २/न्या.प्र./८५-२०१८/ प्रशा-१/८२१४, दि.२०.६.२०१९.
११. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०१८/टे.क्र.२/न्या.प्र./८५-२०१८/प्रशा-१/८४८१, दिनांक २६.६.२०१९.
१२. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.आप्रयो-२०१८/(१६०/१८) मशि १, दि.११.१२.२०१९
१३. संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०१८/टे.क्र.२/न्या.प्र./८५-२०१८/प्रशा-१/१९१९, दिनांक १४.०२.२०२०

<u>प्रस्तावना :-</u>

शासकीय महाविद्यालये/विज्ञान संस्था/अध्यापक महविद्यालये यांमधील सहाय्यक प्राध्यापक/ शारिरीक शिक्षण निर्देशक/ग्रंथपाल यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या अधिसूचना क्र. एफ ३.१/ २००९, दि. ३०.६.२०१० अन्वये निकष विहित करून सेवांतर्गत प्रगती योजना (Career Advancement Scheme) लागू केली आहे. सदर अधिसुचनेतील तरतूदी राज्यात शासन निर्णय क्र. संकीर्ण २०११/(२५/११)/विशि १,दि. १५.२.२०११ अन्वये लागू करण्यात आलेल्या आहेत. तसेच राज्यातील शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय/संस्था आणि शासकीय अध्यापक महाविद्यालये यामधील अध्यापकांना पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी अनुक्रमे शासन निर्णय दि. ११.१२.१९९९ व दि. १२.८.२००९ अन्वये लागू करण्यात आलेल्या आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ३०.१०.२०१० च्या अधिसुचनेनुसार राज्यातील शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय/संस्था आणि शासकीय अध्यापक महाविद्यालये यामधील अध्यापकांची सहयोगी प्राध्यापक, ग्रेड पे ९०००/- या श्रेणीमध्ये स्थान निश्चिती करण्यासाठी शासन निर्णय क्र. एससीपी - २०१३/ (१९२/१३)/मशि-१, दि. ५.८.२०१३ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे. तथापि सदर समितीच्या मान्यतेशिवाय शासकीय महाविद्यालये/संस्था यांमधील अध्यापकांची अवैधरित्या कॅस अंतर्गत

ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्यात आली असल्याबाबत श्री. अनिलकुमार ठवरे यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्र. ८५/२०१८ दाखल केली होती. यास्तव, ज्या सहाय्यक प्राध्यापकांची कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- या वेतनश्रेणीत शासन मान्यतेशिवाय स्थाननिश्चिती करण्यात आली आहे, ती स्थाननिश्चिती योग्य आहे की नाही हे तपासण्यासाठी संदर्भाधिन क्र. ९ येथील दिनांक २२.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये छाननी समिती गठित करण्यात आली. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी त्यांच्या दिनांक २०.६.२०१९ च्या पत्रान्वये सुधारित अहवाल सादर केला. संचालकांनी सादर केलेल्या अहवालास अनुसरुन अध्यापकांची सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ५.८.२०१३ अन्वये गठित समितीची बैठक दिनांक १७.७.२०१९ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर समितीने पात्र अध्यापकांची सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्याची शिफारस केली. दरम्यान मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ८५/२०१८ मध्ये दिनांक ७.११.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत -

"It appears that the petitioner is in Government service and there is no averment in the petition that for filing the present Writ Petition for public interest, permission of the Competent Authority was obtained as required by the rules. The petitioner in his affidavit filed under Rule 7 of the Bombay High Court Public Interest Litigation Rules, 2010 given an undertaking to pay cost as shall be ordered by this court, if it is ultimately held that the petition is frivolous or has been filed for extraneous consideration and lacks bonafide. We fail to understand as to how the petitioner is concerned with the benefits granted to the teachers working under the collages/institutions run by the education department of the State Government. The petitioner claims to be an active social worker and we are not satisfied about the bonafides of the petitioner. Apart from the fact that the Public Interest Litigation cannot be entertained in service matters. We therefore, dismiss this petition."

मा. उच्च न्यायालयाने उपरोक्त आदेश देऊन जनहित याचिका क्र. ८५/२०१८ निकाली काढली आहे. त्यामुळे शासन निर्णय दिनांक २२.११.२०१८ अन्वये संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठित छाननी समितीचा अहवाल विचारात घेऊन संदर्भ क्र.१२ येथील दि.११.१२.२०२० शासननिर्णयान्वये शासकीय महाविद्यालये/संस्था यांमधील अध्यापकांची सहाव्या वेतन आयोगांतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्यात आली होती. तथापि, सदर शासननिर्णय निर्गमित करताना काही अध्यापकांची नावे त्यांच्या स्थाननिश्चितीची गणना करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न झाल्यामुळे सदर शासननिर्णयात समाविष्ट करण्यात आली नव्हती. अशा अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांसंदर्भातील कागदपत्रांची पुर्तता झाली आहे त्या अध्यापकांना दिनांक ११.१२.२०१९ च्या शासननिर्णयाच्या धर्तीवर सहाव्या वेतन आयोगांतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

तसेच, सदर शासननिर्णयात समाविष्ट नसलेल्या परंतु शासन मान्यतेशिवाय स्थाननिश्चिती झालेल्या एकूण ५९ अध्यापकांची नावे संचालनालयाच्या निर्देशनास आली असून संदर्भ क्र.१२ येथील दिनांक११.१२.२०१९ च्या शासननिर्णयाच्या धर्तीवर यापैकी पात्र अध्यापकांना कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक (एजीपी रु.९०००/-) पदावरील स्थाननिश्चितीस कार्योत्तर मान्यता देण्याचा प्रस्ताव संचालकांनी संदर्भ क्र.१३ येथील दिनांक १४.०२.२०२० च्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. सदर अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांची स्थाननिश्चितीची तारीख ही विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचना दि.३०.०६.२०१० पुर्वीची येत असल्याने त्यांना एपीआय आधारीत पीबीएएस पद्धती लागू होत नाही अशा अध्यापकांची उपरोक्त न्यायालयीन प्रकरणी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१२ येथील दिनांक ११.१२.२०१९ च्या शासननिर्णयाच्या धर्तीवर सहाव्या वेतन आयोगांतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय दिनांक १२.८.२००९ अन्वये शासकीय महाविद्यालये/संस्था यांमधील अध्यापकांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला असून त्यानुसार त्यांची स्थाननिश्चिती करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक १२.९.२००९ मधील नियम क्र. २(A) मध्ये कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक (ग्रेड पे ९०००/-) मध्ये पदोन्नतीसाठी खालीलप्रमाणे तरतुदी विहित केलेल्या आहेत-

(ix) Incumbent Readers and Lecturers (Selection Grade) who have completed 3 years in the current pay scale of Rs.12000-18300 on 1.1.2006 shall be placed in Pay Band of Rs.37400-67000 with AGP Pay of Rs.9000 shall be re-designated as Associate Professor.

(x) Incumbent Readers and Lecturers (Selection Grade) who have not completed 3 years in the current pay scale of Rs.12000-18300 on 1.1.2006 shall be placed at the appropriate stage in the Pay Band of Rs.15600-39100 with AGP of Rs.8000 till they complete 3 years of service in the grade of Lecturer (selection Grade)/Reader, and thereafter shall be placed in the higher Pay Band of Rs.37400-67000 and accordingly re-designated as Associate Professor.

(xii)Assistant Professors completing 3 years of teaching in the AGP of Rs.8000 shall be eligible, subject to other conditions that may be prescribed by the UGC and the University, to move to Pay Band of Rs.37400-67000 with AGP of Rs.9000 and to be designated as Associate Professor.

कॅस अंतर्गत स्थाननिश्चितीबाबत युजीसी ने दिनांक ३०.६.२०१० च्या अधिसुचनेन्वये खालीलप्रमाणे स्पष्टीकरणे दिले आहे -

6.3.0- In order to remedy the difficulties of collecting retrospective information and to facilitate the implementation of these regulations from 31.12.2008 in the CAS promotion, the API based PBAS will be progressively and prospectively rolled out. Accordingly the PBAS based on API scores of categories I and II as mentioned in these tables is to be implemented for one year, initially based on the existing systems in universities/ colleges for one year only with the minimum annual scores as depicted in Table II (a) and II (b) for university and college teachers, or by Librarian/ Physical Education and Sport cadres as depicted in table V (a) and V (b), Tables VIII (a) and VIII (b) respectively. This annualized API scores can then be compounded progressively as and when the teacher becomes eligible for CAS promotion to the next cadre. Thus, if a teacher is considered for CAS promotion in 2010, one year API scores for 2009-10 alone will be required for assessment. In case of a teacher being considered for CAs promotion in 2011, two years average of API scores for these categories will required for assessment and so on leading progressively for the complete assessment period. For category III (research and academic contributions) API scores for this category will be applied for the entire assessment period.

6.3.1 - candidates who fulfill all other criteria mentioned in these Regulations, as on 31 December, 2008 and till the date on which this Regulation is notified, can be considered for promotion from the date, on or after 31 December, 2008 on which they fulfill these eligibility conditions, provided as mentioned above.

सदर तरतुदीनुसार दिनांक ३१.१२.२००८ ते दिनांक ३०.६.२०१० या कालावधीत निवडश्रेणीत ३ वर्षे पूर्ण करणारे अध्यापक ज्या दिनांकास उपरोक्त मुद्दा क्र.६.३.० मधील नमूद अर्हता पूर्ण करतात त्या दिनांकास त्यांना सहयोगी प्राध्यापक वेतनश्रेणी लागू आहे. अशा अध्यापकांना कॅस अंतर्गत स्थानिश्चिती देताना API based PBAS लागू आहे.

दिनांक २२.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठित छाननी समितीचा अहवाल, संबंधित अध्यापकांचे वरिष्ठ श्रेणीमधील स्थाननिश्चितीचे शासन निर्णय व कॅस अंतर्गत स्थाननिश्चितीबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या तरतुदी विचारात

घेऊन, या शासन निर्णयासोबतच्या “प्रपत्र-अ” व “प्रपत्र-ब” मध्ये नमूद शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय/संस्था आणि शासकीय अध्यापक महाविद्यालये यांमधील सहाय्यक प्राध्यापकांची त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून सेवांतर्गत प्रगती योजनेतंर्गत (Career Advancement Scheme) सहयोगी प्राध्यापक वेतनश्रेणीमध्ये (ग्रेड पे९०००/-) स्थाननिश्चिती करण्यास पुढीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे :-

१) प्रपत्र अ :- दि.०१.०१.२००६ रोजी निवडश्रेणीत कार्यरत असलेले व दि.०१.०१.२००६ रोजी निवडश्रेणीत ३ वर्षे पूर्ण व एपीआय लागू नाही अशा एकूण ४३ अध्यापकांची कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२) प्रपत्र ब :- दि.०१.०१.२००६ रोजी निवडश्रेणीत कार्यरत असलेले परंतु, दिनांक १.१.२००६ ते दि.३०.६.२०१० या कालावधीत म्हणजेच दिनांक ३०.६.२०१० पूर्वी निवडश्रेणीत ३ वर्षे पूर्ण व एपीआय लागू नाही अशा एकूण २ अध्यापकांची कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

३) प्रपत्र क :- शासननिर्णय दि.११.१२.२०१९ निर्गमित करताना स्थाननिश्चितीची गणना करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न झाल्याने सदर शासननिर्णयात समाविष्ट नसलेल्या परंतु दिनांक १.१.२००६ रोजी निवडश्रेणीत ३ वर्षे पूर्ण व एपीआय लागू नाही अशा एकूण २ अध्यापकांची व दिनांक १.१.२००६ ते दि.३०.६.२०१० या कालावधीत म्हणजेच दिनांक ३०.६.२०१० पूर्वी निवडश्रेणीत ३ वर्षे पूर्ण व एपीआय लागू नाही अशा एकूण १ अध्यापकांची कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

उक्त “प्रपत्र-अ”, “प्रपत्र-ब” मधील अध्यापकांची वेतन निश्चिती करण्याची कार्यवाही संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे करतील. तसेच ज्या अध्यापकांची शासकीय सेवेत रुजू होण्यापुर्वी अशासकीय महाविद्यालयातील सेवा विचारात घेऊन स्थाननिश्चिती करण्यात आली आहे, अशा अध्यापकांनी शासन निर्णय क्र. युएसजी १२९८/३४०२६/(४७१२)/ विशि-४ दि. ०६/०३/१९९९ व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचना क्र. एफ ३.१/२००९, दि. ३०/६/२०१० मधील क्र. १० व १०.१ मध्ये सेवाखंड क्षमापित करण्यासंदर्भात विहित केलेल्या अटींची पुर्तता केली असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संचालक, उच्च शिक्षण यांची राहील.

यासाठी येणारा खर्च, शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक एनजीसी २००९/(२४३/०९)/विशि-१, दि. १२/८/२००९ मध्ये दर्शविलेल्या संबंधित अर्थसंकल्पीय लेखाशिर्षाखाली खर्ची दर्शविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२०१२२९१५३१२५३७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DATTATRAYA RAMBHAU KAHAR

Digitally signed by DATTATRAYA RAMBHAU KAHAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER & TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=44c81ed7c5650383de2d3bd4939feb17be94c77ddf9380bfe3d4af1d10cfd393, serialNumber=6c5292c043ebba90984d77378c6e4fb506d9694e3e8f08dd386c5d3f42e79b10, cn=DATTATRAYA RAMBHAU KAHAR
Date: 2020.12.29 15:37:52 +05'30'

(द. रा. कहार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**सहपत्र :-** प्रपत्र- “अ”, “ब”, “क”

**प्रति,**

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ नागपूर
६. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. सर्व प्राचार्य, शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये.
९. संचालक, वसंतराव नाईक कला व सामाजविज्ञान संस्था, नागपूर.
१०. संचालक, शासकीय विज्ञान संस्था, मुंबई, नागपूर व औरंगाबाद.
११. संचालक, न्याय सहाय्यक विज्ञान संस्था, मुंबई, नागपूर, औरंगाबाद
१२. सर्व प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालये.
१३. सर्व संबंधित सहाय्यक प्राध्यापक यांना संबंधित प्राचार्य/संचालक यांच्यामार्फत
१४. निवडनस्ती/मशि-१.

| शासननिर्णय क्र.आप्रयो-२०१८/ (१६०/१८)/ मशि-१ दि.२९ डिसेंबर, २०२० सोबतचे प्रपत्र अ | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नांव | विषय | महाविद्यालयाचे नाव | सहयोगी प्राध्यापक ९०००/-प्रत्यक्ष अनुज्ञेय दिनांक |
| १ | श्री. एस. पी. यावले | भौतिकशास्त्र | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ०१.०१.२००६ |
| २ | श्रीम. विजया संगावार | भौतिकशास्त्र | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ०१.०१.२००६ |
| ३ | श्रीम पी.बी. लाखानी | सांख्यिकी | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर | ०१.०१.२००६ |
| ४ | श्री. एस. जी. विघे | शारिरीक शिक्षक संचालक | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ०१.०१.२००६ |
| ५ | श्री. बी.बी. चौधरी | संगित | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ०१.०१.२००६ |
| ६ | श्रीम संगिता विष्णूपंत पकडे | भौतिकशास्त्र | सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| ७ | श्री के एस भानू | सांख्यिकी | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| ८ | श्री पुरुषोत्तम अर्जुनवाडकर | भौतिकशास्त्र | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| ९ | डॉ. बी एम सुर्यवंशी | भौतिकशास्त्र | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| १० | डॉ. आर आर देशपांडे | सुक्ष्मजीवशास्त्र | शासकीय विज्ञान संस्था, औरंगाबाद | ०१.०१.२००६ |
| ११ | श्री. एस जी गुप्ता | सुक्ष्मजीवशास्त्र | शासकीय विज्ञान संस्था, औरंगाबाद | ०१.०१.२००६ |
| १२ | श्रीम. सुनेत्रा पाटील (महाराज) | वनस्पतीशास्त्र | वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| १३ | श्रीम. सुनिता सरायकर | इतिहास | वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| १४ | डॉ. बी पी दायदार | समाजशास्त्र | वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| १५ | श्रीम. एस आर पिसे (श्रीम एस एन गंभीर) | गृहअर्थशास्त्र | वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| १६ | श्री. विजय पांडुरंग नारखेडे | संख्याशात्र | इस्माईल युसूफ महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| १७ | **श्री. संतोष राघोजी जाधव** | मानसशास्त्र | इस्माईल युसूफ महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| १८ | श्री. अफसर फारुकी | उर्दु | इस्माईल युसूफ महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| १९ | **श्री. मोहम्मद कलीम जिया** | उर्दु | इस्माईल युसूफ महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| २० | श्री. वामन केशव आचार्य | वाणिज्य | इस्माईल युसूफ महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| २१ | श्रीम. मंजुषा मोळवणे | गृहशास्त्र | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद | ०१.०१.२००६ |
| २२ | श्रीम.के पी खेर्डेकर | संख्याशात्र | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद | ०१.०१.२००६ |
| २३ | श्रीम. के बी देशपांडे | संगित | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद | ०१.०१.२००६ |
| २४ | डॉ. पी टी गोडबोले | शारिरीक शिक्षक संचालक | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद | ०१.०१.२००६ |
| २५ | श्रीम. आर व्ही तडस | विज्ञान | शासकीय अध्यापक महा., अकोला | ०१.०१.२००६ |
| २६ | श्री. जी के मानकर | इंग्रजी | शासकीय अध्यापक महा., अकोला | ०१.०१.२००६ |
| २७ | श्री. गणेश विरभद्र शेटकर | इतिहास | शासकीय अध्यापक महा., बुलढाणा | ०१.०१.२००६ |
| २८ | श्री. मधुकर आर गिते | अर्थशास्त्र | एलफिस्टन महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| २९ | श्रीम. प्रतिमा शरद जाधव | जीवरसायनशास्त्र | शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, मुंबई | ०१.०१.२००६ |
| ३० | श्री. बी बी कदम | मानसशास्त्र | शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, मुंबई | ०१.०१.२००६ |
| ३१ | श्री. एन एम फटांगरे | भौतिकशास्त्र | शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, मुंबई | ०१.०१.२००६ |
| ३२ | श्रीम. सुनिता विष्णू तोरो | वनस्पतीशास्त्र | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर | ०१.०१.२००६ |
| ३३ | श्रीम. शोभना अशोक जाधव (भोसले) | सुक्ष्मजीवशास्त्र | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर | ०१.०१.२००६ |
| ३४ | श्रीम. रश्मी आर नायगांवकर (रेखा उपाध्ये) | इतिहास | शासकीय अध्यापक महा., भंडारा | ०१.०१.२००६ |
| ३५ | श्री. शशांक चिखलीकर | इंग्रजी | शासकीय अध्यापक महा., मुंबई | ०१.०१.२००६ |
| ३६ | श्री. राजेंद्र शांताराम धामणस्कर | रसायनशास्त्र | एलफिस्टन महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| ३७ | श्रीम. व्ही के निळेकर | हिंदी | शासकीय अध्यापक महा., अंबाजोगाई | ०१.०१.२००६ |
| ३८ | श्रीम. जे के देशपांडे | भूगोल | शासकीय अध्यापक महा., अकोला | ०१.०१.२००६ |
| ३९ | श्रीम एस जी रोडगे | मराठी | शासकीय अध्यापक महा., अकोला | ०१.०१.२००६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४० | श्रीम. वर्षा वैद्य | सुक्ष्मजीवशास्त्र | शासकीय अध्यापक महा., अकोला | ०१.०१.२००६ |
| ४१ | श्री. अशोक मानेकर | विज्ञान | शासकीय अध्यापक महा., अकोला | ०१.०१.२००६ |
| ४२ | डॉ. आर बी वैद्य | सुक्ष्मजीवशास्त्र | शासकीय विज्ञान संस्था, मुंबई | ०१.०१.२००६ |
| ४३ | श्री. आर आर वाईकर | संख्याशात्र | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |

| शासननिर्णय क्र.आप्रयो-२०१८/ (१६०/१८)/ मशि-१ दि.२९ डिसेंबर, २०२० सोबतचे प्रपत्र ब | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नांव | विषय | महाविद्यालयाचे नाव | सहयोगी प्राध्यापक ९०००/-प्रत्यक्ष अनुज्ञेय दिनांक |
| १ | श्री. सुशीलकुमार चौधरी | प्राणीशास्त्र | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | २४.१२.२००७ |
| २ | श्री. एम व्ही सानप | हिंदी | शासकीय अध्यापक महा., मुंबई | ०१.१०.२००७ |

शासननिर्णय क्र.आप्रयो-२०१८/ (१६०/१८)/ मशि-१ दि.२९ डिसेंबर, २०२० सोबतचे प्रपत्र क

| अ.क्र. | नांव | विषय | महाविद्यालयाचे नाव | सहयोगी प्राध्यापक ९०००/-प्रत्यक्ष अनुज्ञेय दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. व्ही.के.देशपांडे | गृहअर्थशास्त्र | वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| २ | श्रीम. एस.यु.बोरकर | वनस्पतीशास्त्र | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ०१.०१.२००६ |
| ३ | श्री. हारुण शेख | विज्ञान | शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड | **२८.०७.२००६** |

**अनुकंपा नियुक्तीचे धोरण गट-अ व गट-ब मधील शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : अकंपा -१२२१/प्र.क्र.११२/का-८**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ सप्टेंबर, २०२१.

<u>वाचा</u> :- शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा -१२१७/प्र.क्र.१०२/का-८, दि.२१.०९.२०१७

**<u>प्रस्तावना :</u>**

संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे अनुकंपा नियुक्ती धोरणातील सर्व तरतूदींचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. प्रचलित अनुकंपा नियुक्ती धोरणानुसार गट-क व गट-ड मधील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवेत असताना निधन झाल्यास त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्यास गट-क व गट-ड मधील पदावर अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्ती देण्यात येते.

अनुकंपा नियुक्तीचे मुख्य प्रयोजन हे, "शासकीय सेवेत असताना कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढवणाऱ्या आर्थिक आपत्तीतून कुटुंबास बाहेर काढण्यासाठी आणि या आपत्तीजनक परिस्थितीवर मात करण्यास मदत करण्यासाठी संबंधित मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील एका पात्र सदस्यास शासकीय सेवेत अनुकंपा (सहानुभूती) म्हणून नियुक्ती देणे" असे आहे.

उपरोक्त प्रयोजन तसेच कोविडची पार्श्वभूमी विचारात घेता, गट-क व गट-ड मधील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच गट-अ व गट-ब मधील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना देखिल ही योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

दिनांक २६ ऑगस्ट,२०२१ रोजीच्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

अ) गट-क व ड मधील शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे, अनुकंपा तत्वावर नियुक्तीचे धोरण, गट-अ आणि ब मधील शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येत आहे. त्यानुसार शासकीय सेवेत असताना गट-अ व गट-ब मधील दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पात्र सदस्यास गट-क व गट-ड मध्ये अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय करण्यात येत आहे.

ब) कोविडच्या पार्श्वभूमीवर सदर योजनेचा लाभ हा दिनांक १ जानेवारी,२०२० पासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०९२७१६५६०३९५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee52994443a8509075101cc93, serialNumber=92d474843b842720200d1a10946d5fc9348b9450f867605a47d177207c9bd384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2021.09.27 16:58:42 +05'30'

**( गीता कुलकर्णी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, मलबार हिल मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. सर्व सन्माननीय विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य.
५. मा. मुख्य सचिव
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व राज्य शासकीय कार्यालयांना संबंधित प्रशासकीय विभागामार्फत)
७. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
८. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
९. निवड नस्ती. (कार्यासन-८)

**शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय/ संस्था आणि शासकीय अध्यापक महाविद्यालये यामधील सहाय्यक प्राध्यापकांची कॅस योजनेंतर्गत सहयोगी प्राध्यापक वेतनश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आप्रयो-२०१८/(१६०/१८)/मशि १**
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनाक : २९ डिसेंबर, २०२०

<u>वाचा :-</u>

१. विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. एफ ३.१/२००९ दि. ३०.६.२०१०
२. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण २०११ (२५/११) विशि १ दि. १५.२.२०११
३. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. एनजीसी २००९/(२४३/०९)/विशि-१,दि.१२.८.२००९.
४. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. युएसजी १२९८/३४०२६/(४७१२)/विशि-४ दि.०६.०३.१९९९.
५. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. एनजीसी § १२९८ /(४६१९)/विशि-४ दि.११.१२.१९९९.
६. विद्यापीठ अनुदान आयोगाचे क्र. १-२/२००९(EC/PS)Pt. VIII दि. ७.१२.२०१२
७. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. एससीपी -२०१३/(१९२/१३)/मशि-१,दि. ५.८.२०१३.
८. शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१३/(प्रक. ४२०/१३) मशि १, दि. ३१.१.२०१५
९. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. आप्रयो २०१८/(१६०/१८)/मशि-१,दि. २२.११.२०१८
१०. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०१८/टे.क्र. २/न्या.प्र./८५-२०१८/ प्रशा-१/८२१४, दि.२०.६.२०१९.
११. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०१८/टे.क्र.२/न्या.प्र./८५-२०१८/प्रशा-१/८४८१, दिनांक २६.६.२०१९.
१२. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.आप्रयो-२०१८/(१६०/१८) मशि १, दि.११.१२.२०१९
१३. संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०१८/टे.क्र.२/न्या.प्र./८५-२०१८/प्रशा-१/१९१९, दिनांक १४.०२.२०२०

<u>प्रस्तावना :-</u>

शासकीय महाविद्यालये/विज्ञान संस्था/अध्यापक महविद्यालये यांमधील सहाय्यक प्राध्यापक/ शारिरीक शिक्षण निर्देशक/ग्रंथपाल यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या अधिसूचना क्र. एफ ३.१/ २००९, दि. ३०.६.२०१० अन्वये निकष विहित करून सेवांतर्गत प्रगती योजना (Career Advancement Scheme) लागू केली आहे. सदर अधिसुचनेतील तरतूदी राज्यात शासन निर्णय क्र. संकीर्ण २०११/(२५/११)/विशि १,दि. १५.२.२०११ अन्वये लागू करण्यात आलेल्या आहेत. तसेच राज्यातील शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय/संस्था आणि शासकीय अध्यापक महाविद्यालये यामधील अध्यापकांना पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी अनुक्रमे शासन निर्णय दि. ११.१२.१९९९ व दि. १२.८.२००९ अन्वये लागू करण्यात आलेल्या आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ३०.१०.२०१० च्या अधिसुचनेनुसार राज्यातील शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय/संस्था आणि शासकीय अध्यापक महाविद्यालये यामधील अध्यापकांची सहयोगी प्राध्यापक, ग्रेड पे ९०००/- या श्रेणीमध्ये स्थान निश्चिती करण्यासाठी शासन निर्णय क्र. एससीपी - २०१३/ (१९२/१३)/मशि-१, दि. ५.८.२०१३ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे. तथापि सदर समितीच्या मान्यतेशिवाय शासकीय महाविद्यालये/संस्था यांमधील अध्यापकांची अवैधरित्या कॅस अंतर्गत

ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्यात आली असल्याबाबत श्री. अनिलकुमार ठवरे यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्र. ८५/२०१८ दाखल केली होती. यास्तव, ज्या सहाय्यक प्राध्यापकांची कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- या वेतनश्रेणीत शासन मान्यतेशिवाय स्थाननिश्चिती करण्यात आली आहे, ती स्थाननिश्चिती योग्य आहे की नाही हे तपासण्यासाठी संदर्भाधिन क्र. ९ येथील दिनांक २२.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये छाननी समिती गठित करण्यात आली. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी त्यांच्या दिनांक २०.६.२०१९ च्या पत्रान्वये सुधारित अहवाल सादर केला. संचालकांनी सादर केलेल्या अहवालास अनुसरुन अध्यापकांची सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ५.८.२०१३ अन्वये गठित समितीची बैठक दिनांक १७.७.२०१९ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर समितीने पात्र अध्यापकांची सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्याची शिफारस केली. दरम्यान मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ८५/२०१८ मध्ये दिनांक ७.११.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत -

"It appears that the petitioner is in Government service and there is no averment in the petition that for filing the present Writ Petition for public interest, permission of the Competent Authority was obtained as required by the rules. The petitioner in his affidavit filed under Rule 7 of the Bombay High Court Public Interest Litigation Rules, 2010 given an undertaking to pay cost as shall be ordered by this court, if it is ultimately held that the petition is frivolous or has been filed for extraneous consideration and lacks bonafide. We fail to understand as to how the petitioner is concerned with the benefits granted to the teachers working under the collages/institutions run by the education department of the State Government. The petitioner claims to be an active social worker and we are not satisfied about the bonafides of the petitioner. Apart from the fact that the Public Interest Litigation cannot be entertained in service matters. We therefore, dismiss this petition."

मा. उच्च न्यायालयाने उपरोक्त आदेश देऊन जनहित याचिका क्र. ८५/२०१८ निकाली काढली आहे. त्यामुळे शासन निर्णय दिनांक २२.११.२०१८ अन्वये संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठित छाननी समितीचा अहवाल विचारात घेऊन संदर्भ क्र.१२ येथील दि.११.१२.२०२० शासननिर्णयान्वये शासकीय महाविद्यालये/संस्था यांमधील अध्यापकांची सहाव्या वेतन आयोगांतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्यात आली होती. तथापि, सदर शासननिर्णय निर्गमित करताना काही अध्यापकांची नावे त्यांच्या स्थाननिश्चितीची गणना करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न झाल्यामुळे सदर शासननिर्णयात समाविष्ट करण्यात आली नव्हती. अशा अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांसंदर्भातील कागदपत्रांची पुर्तता झाली आहे त्या अध्यापकांना दिनांक ११.१२.२०१९ च्या शासननिर्णयाच्या धर्तीवर सहाव्या वेतन आयोगांतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

तसेच, सदर शासननिर्णयात समाविष्ट नसलेल्या परंतु शासन मान्यतेशिवाय स्थाननिश्चिती झालेल्या एकूण ५९ अध्यापकांची नावे संचालनालयाच्या निर्देशनास आली असून संदर्भ क्र.१२ येथील दिनांक११.१२.२०१९ च्या शासननिर्णयाच्या धर्तीवर यापैकी पात्र अध्यापकांना कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक (एजीपी रु.९०००/-) पदावरील स्थाननिश्चितीस कार्योत्तर मान्यता देण्याचा प्रस्ताव संचालकांनी संदर्भ क्र.१३ येथील दिनांक १४.०२.२०२० च्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. सदर अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांची स्थाननिश्चितीची तारीख ही विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचना दि.३०.०६.२०१० पुर्वीची येत असल्याने त्यांना एपीआय आधारीत पीबीएएस पद्धती लागू होत नाही अशा अध्यापकांची उपरोक्त न्यायालयीन प्रकरणी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१२ येथील दिनांक ११.१२.२०१९ च्या शासननिर्णयाच्या धर्तीवर सहाव्या वेतन आयोगांतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय दिनांक १२.८.२००९ अन्वये शासकीय महाविद्यालये/संस्था यांमधील अध्यापकांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला असून त्यानुसार त्यांची स्थाननिश्चिती करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक १२.९.२००९ मधील नियम क्र. २(A) मध्ये कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक (ग्रेड पे ९०००/-) मध्ये पदोन्नतीसाठी खालीलप्रमाणे तरतुदी विहित केलेल्या आहेत-

(ix) Incumbent Readers and Lecturers (Selection Grade) who have completed 3 years in the current pay scale of Rs.12000-18300 on 1.1.2006 shall be placed in Pay Band of Rs.37400-67000 with AGP Pay of Rs.9000 shall be re-designated as Associate Professor.

(x) Incumbent Readers and Lecturers (Selection Grade) who have not completed 3 years in the current pay scale of Rs.12000-18300 on 1.1.2006 shall be placed at the appropriate stage in the Pay Band of Rs.15600-39100 with AGP of Rs.8000 till they complete 3 years of service in the grade of Lecturer (selection Grade)/Reader, and thereafter shall be placed in the higher Pay Band of Rs.37400-67000 and accordingly re-designated as Associate Professor.

(xii)Assistant Professors completing 3 years of teaching in the AGP of Rs.8000 shall be eligible, subject to other conditions that may be prescribed by the UGC and the University, to move to Pay Band of Rs.37400-67000 with AGP of Rs.9000 and to be designated as Associate Professor.

कॅस अंतर्गत स्थाननिश्चितीबाबत युजीसी ने दिनांक ३०.६.२०१० च्या अधिसुचनेन्वये खालीलप्रमाणे स्पष्टीकरणे दिले आहे -

6.3.0- In order to remedy the difficulties of collecting retrospective information and to facilitate the implementation of these regulations from 31.12.2008 in the CAS promotion, the API based PBAS will be progressively and prospectively rolled out. Accordingly the PBAS based on API scores of categories I and II as mentioned in these tables is to be implemented for one year, initially based on the existing systems in universities/ colleges for one year only with the minimum annual scores as depicted in Table II (a) and II (b) for university and college teachers, or by Librarian/ Physical Education and Sport cadres as depicted in table V (a) and V (b), Tables VIII (a) and VIII (b) respectively. This annualized API scores can then be compounded progressively as and when the teacher becomes eligible for CAS promotion to the next cadre. Thus, if a teacher is considered for CAS promotion in 2010, one year API scores for 2009-10 alone will be required for assessment. In case of a teacher being considered for CAs promotion in 2011, two years average of API scores for these categories will required for assessment and so on leading progressively for the complete assessment period. For category III (research and academic contributions) API scores for this category will be applied for the entire assessment period.

6.3.1 - candidates who fulfill all other criteria mentioned in these Regulations, as on 31 December, 2008 and till the date on which this Regulation is notified, can be considered for promotion from the date, on or after 31 December, 2008 on which they fulfill these eligibility conditions, provided as mentioned above.

सदर तरतुदीनुसार दिनांक ३१.१२.२००८ ते दिनांक ३०.६.२०१० या कालावधीत निवडश्रेणीत ३ वर्षे पूर्ण करणारे अध्यापक ज्या दिनांकास उपरोक्त मुद्दा क्र.६.३.० मधील नमूद अर्हता पूर्ण करतात त्या दिनांकास त्यांना सहयोगी प्राध्यापक वेतनश्रेणी लागू आहे. अशा अध्यापकांना  कॅस अंतर्गत स्थानिश्चिती देताना API based PBAS लागू आहे.

दिनांक २२.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठित छाननी समितीचा अहवाल, संबंधित अध्यापकांचे वरिष्ठ श्रेणीमधील स्थाननिश्चितीचे शासन निर्णय व कॅस अंतर्गत स्थाननिश्चितीबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या तरतुदी विचारात

घेऊन, या शासन निर्णयासोबतच्या “प्रपत्र-अ” व “प्रपत्र-ब” मध्ये नमूद शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय/संस्था आणि शासकीय अध्यापक महाविद्यालये यांमधील सहाय्यक प्राध्यापकांची त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून सेवांतर्गत प्रगती योजनेतंर्गत (Career Advancement Scheme) सहयोगी प्राध्यापक वेतनश्रेणीमध्ये (ग्रेड पे९०००/-) स्थाननिश्चिती करण्यास पुढीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे :-

१) प्रपत्र अ :- दि.०१.०१.२००६ रोजी निवडश्रेणीत कार्यरत असलेले व दि.०१.०१.२००६ रोजी निवडश्रेणीत ३ वर्षे पूर्ण व एपीआय लागू नाही अशा एकूण ४३ अध्यापकांची कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२) प्रपत्र ब :- दि.०१.०१.२००६ रोजी निवडश्रेणीत कार्यरत असलेले परंतु, दिनांक १.१.२००६ ते दि.३०.६.२०१० या कालावधीत म्हणजेच दिनांक ३०.६.२०१० पूर्वी निवडश्रेणीत ३ वर्षे पूर्ण व एपीआय लागू नाही अशा एकूण २ अध्यापकांची कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

३) प्रपत्र क :- शासननिर्णय दि.११.१२.२०१९ निर्गमित करताना स्थाननिश्चितीची गणना करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न झाल्याने सदर शासननिर्णयात समाविष्ट नसलेल्या परंतु दिनांक १.१.२००६ रोजी निवडश्रेणीत ३ वर्षे पूर्ण व एपीआय लागू नाही अशा एकूण २ अध्यापकांची व दिनांक १.१.२००६ ते दि.३०.६.२०१० या कालावधीत म्हणजेच दिनांक ३०.६.२०१० पूर्वी निवडश्रेणीत ३ वर्षे पूर्ण व एपीआय लागू नाही अशा एकूण १ अध्यापकांची कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक ग्रेड पे ९०००/- मध्ये स्थाननिश्चिती करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

उक्त “प्रपत्र-अ”, “प्रपत्र-ब” मधील अध्यापकांची वेतन निश्चिती करण्याची कार्यवाही संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे करतील. तसेच ज्या अध्यापकांची शासकीय सेवेत रुजू होण्यापुर्वी अशासकीय महाविद्यालयातील सेवा विचारात घेऊन स्थाननिश्चिती करण्यात आली आहे, अशा अध्यापकांनी शासन निर्णय क्र. युएसजी १२९८/३४०२६/(४७१२)/ विशि-४ दि. ०६/०३/१९९९ व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचना क्र. एफ ३.१/२००९, दि. ३०/६/२०१० मधील क्र. १० व १०.१ मध्ये सेवाखंड क्षमापित करण्यासंदर्भात विहित केलेल्या अटींची पुर्तता केली असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संचालक, उच्च शिक्षण यांची राहील.

यासाठी येणारा खर्च, शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक एनजीसी २००९/(२४३/०९)/विशि-१, दि. १२/८/२००९ मध्ये दर्शविलेल्या संबंधित अर्थसंकल्पीय लेखाशिर्षाखाली खर्ची दर्शविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२०१२२९१५३१२५३७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DATTATRAYA
RAMBHAU KAHAR

Digitally signed by DATTATRAYA RAMBHAU KAHAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER & TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=44c81ed7c5650383de2d3bd4939feb17be94c77ddf9380bfe3d4af1d10cfd393, serialNumber=6c5292c043ebba90984d77378c6e4fb506d9694e3e8f08dd386c5d3f42e79b10, cn=DATTATRAYA RAMBHAU KAHAR
Date: 2020.12.29 15:37:52 +05'30'

(द. रा. कहार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**सहपत्र :-** प्रपत्र- “अ”, “ब”, “क”

**प्रति,**

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ नागपूर
६. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. सर्व प्राचार्य, शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये.
९. संचालक, वसंतराव नाईक कला व सामाजविज्ञान संस्था, नागपूर.
१०. संचालक, शासकीय विज्ञान संस्था, मुंबई, नागपूर व औरंगाबाद.
११. संचालक, न्याय सहाय्यक विज्ञान संस्था, मुंबई, नागपूर, औरंगाबाद
१२. सर्व प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालये.
१३. सर्व संबंधित सहाय्यक प्राध्यापक यांना संबंधित प्राचार्य/संचालक यांच्यामार्फत
१४. निवडनस्ती/मशि-१.

| शासननिर्णय क्र.आप्रयो-२०१८/ (१६०/१८)/ मशि-१ दि.२९ डिसेंबर, २०२० सोबतचे प्रपत्र अ | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नांव | विषय | महाविद्यालयाचे नाव | सहयोगी प्राध्यापक ९०००/-प्रत्यक्ष अनुज्ञेय दिनांक |
| १ | श्री. एस. पी. यावले | भौतिकशास्त्र | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ०१.०१.२००६ |
| २ | श्रीम. विजया संगावार | भौतिकशास्त्र | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ०१.०१.२००६ |
| ३ | श्रीम पी.बी. लाखानी | सांख्यिकी | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर | ०१.०१.२००६ |
| ४ | श्री. एस. जी. विघे | शारिरीक शिक्षक संचालक | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ०१.०१.२००६ |
| ५ | श्री. बी.बी. चौधरी | संगित | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ०१.०१.२००६ |
| ६ | श्रीम संगिता विष्णूपंत पकडे | भौतिकशास्त्र | सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| ७ | श्री के एस भानू | सांख्यिकी | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| ८ | श्री पुरुषोत्तम अर्जुनवाडकर | भौतिकशास्त्र | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| ९ | डॉ. बी एम सुर्यवंशी | भौतिकशास्त्र | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| १० | डॉ. आर आर देशपांडे | सुक्ष्मजीवशास्त्र | शासकीय विज्ञान संस्था, औरंगाबाद | ०१.०१.२००६ |
| ११ | श्री. एस जी गुप्ता | सुक्ष्मजीवशास्त्र | शासकीय विज्ञान संस्था, औरंगाबाद | ०१.०१.२००६ |
| १२ | श्रीम. सुनेत्रा पाटील (महाराज) | वनस्पतीशास्त्र | वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| १३ | श्रीम. सुनिता सरायकर | इतिहास | वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| १४ | डॉ. बी पी दायदार | समाजशास्त्र | वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| १५ | श्रीम. एस आर पिसे (श्रीम एस एन गंभीर) | गृहअर्थशास्त्र | वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| १६ | श्री. विजय पांडुरंग नारखेडे | संख्याशात्र | इस्माईल युसूफ महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| १७ | **श्री. संतोष राघोजी जाधव** | मानसशास्त्र | इस्माईल युसूफ महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| १८ | श्री. अफसर फारुकी | उर्दु | इस्माईल युसूफ महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| १९ | **श्री. मोहम्मद कलीम जिया** | उर्दु | इस्माईल युसूफ महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| २० | श्री. वामन केशव आचार्य | वाणिज्य | इस्माईल युसूफ महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| २१ | श्रीम. मंजुषा मोळवणे | गृहशास्त्र | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद | ०१.०१.२००६ |
| २२ | श्रीम.के पी खेर्डेकर | संख्याशात्र | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद | ०१.०१.२००६ |
| २३ | श्रीम. के बी देशपांडे | संगित | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद | ०१.०१.२००६ |
| २४ | डॉ. पी टी गोडबोले | शारिरीक शिक्षक संचालक | शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद | ०१.०१.२००६ |
| २५ | श्रीम. आर व्ही तडस | विज्ञान | शासकीय अध्यापक महा., अकोला | ०१.०१.२००६ |
| २६ | श्री. जी के मानकर | इंग्रजी | शासकीय अध्यापक महा., अकोला | ०१.०१.२००६ |
| २७ | श्री. गणेश विरभद्र शेटकर | इतिहास | शासकीय अध्यापक महा., बुलढाणा | ०१.०१.२००६ |
| २८ | श्री. मधुकर आर गिते | अर्थशास्त्र | एलफिस्टन महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| २९ | श्रीम. प्रतिमा शरद जाधव | जीवरसायनशास्त्र | शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, मुंबई | ०१.०१.२००६ |
| ३० | श्री. बी बी कदम | मानसशास्त्र | शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, मुंबई | ०१.०१.२००६ |
| ३१ | श्री. एन एम फटांगरे | भौतिकशास्त्र | शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, मुंबई | ०१.०१.२००६ |
| ३२ | श्रीम. सुनिता विष्णू तोरो | वनस्पतीशास्त्र | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर | ०१.०१.२००६ |
| ३३ | श्रीम. शोभना अशोक जाधव (भोसले) | सुक्ष्मजीवशास्त्र | राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर | ०१.०१.२००६ |
| ३४ | श्रीम. रश्मी आर नायगांवकर (रेखा उपाध्ये) | इतिहास | शासकीय अध्यापक महा., भंडारा | ०१.०१.२००६ |
| ३५ | श्री. शशांक चिखलीकर | इंग्रजी | शासकीय अध्यापक महा., मुंबई | ०१.०१.२००६ |
| ३६ | श्री. राजेंद्र शांताराम धामणस्कर | रसायनशास्त्र | एलफिस्टन महाविद्यालय, मुंबई | ०१.०१.२००६ |
| ३७ | श्रीम. व्ही के निळेकर | हिंदी | शासकीय अध्यापक महा., अंबाजोगाई | ०१.०१.२००६ |
| ३८ | श्रीम. जे के देशपांडे | भूगोल | शासकीय अध्यापक महा., अकोला | ०१.०१.२००६ |
| ३९ | श्रीम एस जी रोडगे | मराठी | शासकीय अध्यापक महा., अकोला | ०१.०१.२००६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४० | श्रीम. वर्षा वैद्य | सुक्ष्मजीवशास्त्र | शासकीय अध्यापक महा., अकोला | ०१.०१.२००६ |
| ४१ | श्री. अशोक मानेकर | विज्ञान | शासकीय अध्यापक महा., अकोला | ०१.०१.२००६ |
| ४२ | डॉ. आर बी वैद्य | सुक्ष्मजीवशास्त्र | शासकीय विज्ञान संस्था, मुंबई | ०१.०१.२००६ |
| ४३ | श्री. आर आर वाईकर | संख्याशात्र | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |

| शासननिर्णय क्र.आप्रयो-२०१८/ (१६०/१८)/ मशि-१ दि.२९ डिसेंबर, २०२० सोबतचे प्रपत्र ब | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नांव | विषय | महाविद्यालयाचे नाव | सहयोगी प्राध्यापक ९०००/-प्रत्यक्ष अनुज्ञेय दिनांक |
| १ | श्री. सुशीलकुमार चौधरी | प्राणीशास्त्र | शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | २४.१२.२००७ |
| २ | श्री. एम व्ही सानप | हिंदी | शासकीय अध्यापक महा., मुंबई | ०१.१०.२००७ |

शासननिर्णय क्र.आप्रयो-२०१८/ (१६०/१८)/ मशि-१ दि.२९ डिसेंबर, २०२० सोबतचे प्रपत्र क

| अ.क्र. | नांव | विषय | महाविद्यालयाचे नाव | सहयोगी प्राध्यापक ९०००/-प्रत्यक्ष अनुज्ञेय दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. व्ही.के.देशपांडे | गृहअर्थशास्त्र | वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर | ०१.०१.२००६ |
| २ | श्रीम. एस.यु.बोरकर | वनस्पतीशास्त्र | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ०१.०१.२००६ |
| ३ | श्री. हारुण शेख | विज्ञान | शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड | **२८.०७.२००६** |

**घरबांधणी अग्रिम**
**अग्रीमाच्या रकमेत तसेच घराच्या किंमत मर्यादेत सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/ विनियम**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०२१

**वाचा :** १) मुंबई वित्तीय नियम, १९५९ ,परिशिष्ट-२६ ,अधिसूचना दि.२८.७.१९६२.
२) शासन निर्णय, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.२०.२.२०१५.
३) शासन निर्णय, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.१२.१०.२०१५.
४) शासन शुध्दीपत्र, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.२९.२.२०१६.
५) शासन निर्णय, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.१.२.२०१८.
६) शासन निर्णय, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.२२.३.२०१९.
७) शासन निर्णय, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.२४.४.२०१९.

**प्रस्तावना -**

वित्त विभाग, शासन निर्णय, दि.२०.२.२०१५ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या घरबांधणी अग्रीमाची रक्कम तसेच घराची किंमत मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. आता वित्त विभाग, शासन अधिसूचना, दि.३० जानेवारी,२०१९ अन्वये ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य शासकीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी दि.१.१.२०१६ पासून सुधारीत करण्यात आल्या आहेत. या सुधारीत वेतन श्रेणीतील मुळ वेतन, घर बांधणी अग्रीम मंजूरीकरीता विचारात घेण्याची व त्यानुषंगाने घराच्या किंमत मर्यादेत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१) **घर बांधणी अग्रिमाची कमाल मर्यादा :-**

घरबांधणी विषयक विविध प्रयोजनांसाठी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना घर बांधणी अग्रिम मंजूर करण्याकरीता सातव्या वेतन आयोगानुसार मुळ वेतन विचारात घेण्यात यावे. अशा वेतनावर आधारीत घरबांधणी अग्रिम मंजूरीकरीता वित्त विभागाच्या क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५,दि.१६ डिसेंबर,२०१६ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या (तसेच त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणांनुसार) “एक्स”, “वाय” व त्या व्यतिरिक्त उर्वरीत वर्गीकरणातील शहरांमध्ये घर/ सदनिका/जमीन खरेदीसाठी सुधीरात कमाल मर्यादा पुढीलप्रमाणे असतील.

| **प्रयोजन** | **घरबांधणी अग्रिमाच्या रकमेची कमाल मर्यादा** | | |
|---|---|---|---|
| | वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५, दि.१६ डिसेंबर,२०१६ मध्ये नमूद खालील वर्गीकरणाच्या शहरांमधील घर खरेदीकरीता | | |
| | **"एक्स" वर्गीकरण** | **"वाय" वर्गीकरण** | **उर्वरीत वर्गीकरण** |
| १ | २ | ३ | ४ |
| (अ) (१) जमीन खरेदी करुन त्यावर विहित कालावधीत घर बांधणे **किंवा** (२) स्वत:च्या मालकीच्या जागेवर नवीन घर बांधणे, **किंवा** (३) स्वत:च्या मालकीच्या जागेवरील मोडकळीस आलेले घर पाडून नवीन घर बांधणे, **किंवा** (४) बांधकाम चालू असलेले नवीन घर **किंवा** तयार नवीन घर खरेदी करणे. | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹७० लक्ष **किंवा** घराची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹५० लक्ष **किंवा** घराची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹४० लक्ष **किंवा** घराची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. |
| ब) घर बांधण्यासाठी जमीन खरेदी करणे. | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹२१ लक्ष **किंवा** जमिनीची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹१५ लक्ष **किंवा** जमिनीची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹१२ लक्ष **किंवा** जमिनीची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| क) स्वत:च्या मालकीच्या राहत्या घराचे नवीन बांधकाम करुन विस्तार करणे. (अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी एकदाही अग्रिम घेतलेले नसल्यास.) | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹२१ लक्ष **किंवा** बांधकामाची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹१५ लक्ष **किंवा** बांधकामाची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹१२ लक्ष **किंवा** बांधकामाची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. |
| ड) सध्याचे राहते घर निवास योग्य करण्यासाठी असाधारण व विशेष स्वरुपाची दुरुस्ती करणे. (नैसर्गिक आपत्ती मुळे नुकसान पोहोचलेले घर पुन:निवास योग्य करण्यासाठी आवश्यक असलेली दुरुस्ती.) {राहत्या घरात नवीन सोयी **किंवा** अंतर्गत सजावट करणे यासाठी अनुज्ञेय नाही.} | मुळ वेतनाच्या ५० पट **किंवा** ₹१०.५० लक्ष **किंवा** घर दुरुस्तीचा खर्च **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुळ वेतनाच्या ५० पट **किंवा** ₹७.५० लक्ष **किंवा** घर दुरुस्तीचा खर्च **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुळ वेतनाच्या ५० पट **किंवा** ₹६.०० लक्ष **किंवा** घर दुरुस्तीचा खर्च **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. |

| **प्रयोजन** | **घरबांधणी अग्रिमाच्या रकमेची कमाल मर्यादा** | | |
|---|---|---|---|
| | वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५, दि.१६ डिसेंबर,२०१६ मध्ये नमूद खालील वर्गीकरणाच्या शहरांमधील घर खरेदीकरीता | | |
| | **"एक्स" वर्गीकरण** | **"वाय" वर्गीकरण** | **उर्वरीत वर्गीकरण** |
| १ | २ | ३ | ४ |
| इ) हौसिंग डेव्हलपमेंट फायन्सास कार्पोरेशन(H.D.F.C.),राष्ट्रीयकृत बँका / सहकारी बँका, महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायन्सास कार्पोरेशन व तत्सम शासन मान्य वित्तीय संस्थाकडून घरबांधणीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी. | अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला शिल्लक असलेली कर्जाची रक्कम **किंवा** मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹७० लक्ष **किंवा** घराची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला शिल्लक असलेली कर्जाची रक्कम **किंवा** मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹५० लक्ष **किंवा** घराची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला शिल्लक असलेली कर्जाची रक्कम **किंवा** मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹४० लक्ष **किंवा** घराची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. |
| फ) जुने घर विकत घेण्यासाठी | मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी (Authorised Valuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जुन्या घराची किंमत **किंवा** मूळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹७० लक्ष **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी (Authorised Valuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जुन्या घराची किंमत **किंवा** मूळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹५० लक्ष **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी (Authorised Valuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जुन्या घराची किंमत **किंवा** मूळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹४० लक्ष **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. |

२. **<u>घरबांधणी अग्रिम मंजूरीसाठी घराची किंमत मर्यादा</u>:-**

वित्त विभागाच्या क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५,दि.१६ डिसेंबर,२०१६ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या "एक्स" व "वाय" या वर्गीकरणातील शहरांमध्ये नवीन बांधावयाच्या किंवा विकत घ्यावयाच्या तयार नवीन घराची / जुन्या घराची किंमत मर्यादा (जमिनीची किंमत वगळून) कमाल ₹२.०० कोटी व त्याव्यतिरिक्त अन्य ठिकाणांकरीता कमाल ₹१.०० कोटी अशी विहित करण्यात येत आहे. घर बांधणी अग्रिम मंजूरीसाठी सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांना सदर कमाल मर्यादा प्रकरणपरत्वे गुणवत्तेच्या आधारे २५ टक्केपर्यंत शिथिल करण्याचे पूर्ण अधिकार असतील. त्यावरील रकमेची प्रकरणे वित्त विभागाकडे सादर करण्यात यावीत.

३. **<u>घरबांधणी अग्रिमाची वसुली :-</u>**

(अ) अग्रीमाची व्याजासह वसुली अग्रीमधारकाच्या सेवानिवृत्तीपूर्वी पूर्ण होईल अशा रीतीने करण्यात यावी. उपरोक्त "**अ**", "**इ**" आणि " **फ** " येथील प्रयोजनाकरीता कमाल २० वर्षात, प्रथम १९२ मासिक हप्त्यात मुळ अग्रिम व नंतर ४८ मासिक हप्त्यात व्याज वसूल करण्यात यावे. "**ब** " , " **क** " आणि "**ड**" येथील प्रयोजनासाठी घेतलेल्या अग्रिमाची वसुली व्याजासह कमाल ९६ मासिक हप्त्यात, प्रथम ७२ मासिक हप्त्यात मुळ अग्रिम व नंतर २४ मासिक हप्त्यात व्याजाची रक्कम वसूल करण्यात यावी. अग्रिम धारक त्याच्या इच्छेनुसार कमी कालावधीत अग्रिम व व्याजाची रक्कम फेडण्यासाठी मासिक हप्त्याची रक्कम वाढवू शकेल.

अग्रीमधारकाचा सेवा कालावधी उपरोक्त नमूद कालमर्यादेपेक्षा कमी शिल्लक आहे अश्या प्रकरणी, उर्वरीत सेवा कालावधी विचारात घेऊन मुद्दल व व्याज वसुली सेवानिवृत्तीपूर्वी पूर्ण होईल या दृष्टीने मुद्दल व व्याजाचा वसुली कालावधी निश्चित करण्यात यावा.

(ब) घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकरकमी मंजूर केली असल्यास, अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाची रक्कम वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात यावी.

घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकापेक्षा अधिक हप्त्यात मंजूर केली असल्यास अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाचा प्रथम हप्ता वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात यावी.

४. शासकीय कर्मचाऱ्यास घर खरेदी / बांधकाम करण्यास सहाय्यभूत व्हावे यासाठी शासन निर्णय क्र.एचबीए -१०८३/सीआर ४६५/जीईएन ५, दि.१३.०६.१९८४ मधील परि. ३ मधील घराचा व्दितीय प्रभार स्वीकारण्याबाबत,सदर शासन निर्णयातील अन्य अटी व शर्तींच्या अधीन राहून, सदर घर / सदनिका यावर वित्तीय संस्थेचे कर्ज व शासन अग्रीम यांच्या टक्केवारीच्या प्रमाणानुसार प्रभार निर्माण करुन इतर वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारता येईल. कोणत्याही परिस्थितीत शासन अग्रीम रक्कम मंजूर केलेल्या प्रमाणाच्या टक्केवारीपेक्षा कमी प्रभार स्विकारणार नाही. शासन व वित्तीय संस्था या दोन्हींचा मिळून येणारा प्रभार घराच्या किंमती इतका असावा.

५. खाजगी बांधकाम व्यावसायिक (बिल्डर) ठेकेदार, कंपनी, सिडको, हुडको, म्हाडा, शासनाने मंजूर केलेल्या कोटयातून इत्यादी मार्गाने तयार सदनिका अथवा बांधकाम सुरु असलेल्या इमारतीत सदनिका खरेदी करण्यासाठी मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील परिशिष्ट-२६ मधील तरतुदीनुसार प्रकरणपरत्वे एक किंवा एका पेक्षा जास्त हप्त्यात अग्रिम अनुज्ञेय राहील.

६. शासन सेवेतील पुनर्नियुक्त माजी सैनिक असलेल्या कर्मचाऱ्याला संदर्भाधीन शासन निर्णय क्र.अग्रीम-१०९६/प्र.क्र.४/९६/विनियम, दि.२३.६.१९९७ मधील तरतूदीनुसार अग्रिम अनुज्ञेय राहील.

७. <u>अग्रिम मंजूरीसाठी पुढीलप्रमाणे अटी लागु राहतील</u>:-

१. ज्यांना घरबांधणी अग्रीम मंजूर करावयाचे आहे, अशा अधिकारी/कर्मचाऱ्याची शासनाच्या सेवेतील नियुक्ती संबंधित पदाच्या सेवाभरती नियमानुसार करण्यात आलेली असली पाहिजे आणि अशा प्रकारे करण्यात आलेल्या नियुक्तीनंतर कमीत कमी ५ वर्षांची सेवा झाली असली पाहिजे. त्याचप्रमाणे अग्रिम मंजूर करतेवेळी अधिकारी / कर्मचारी यांची किमान ५ वर्ष सेवा शिल्लक असणे अनिवार्य आहे.

२. वरील सर्व प्रयोजनार्थ संपूर्ण शासकीय सेवेमध्ये फक्त एकदाच अग्रिम अनुज्ञेय होईल. मात्र, शासनाकडून अग्रिम घेऊन बांधलेल्या / खरेदी केलेल्या घराच्या **नैसर्गिक आपत्तीतून उद्भवलेल्या** दुरुस्तीकरता पहिल्यांदा मंजूर झालेले अग्रिम व या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय होणारे घरबांधणी अग्रिम यामधील फरकाएवढी रक्कम घरबांधणी अग्रीम म्हणून दुसऱ्यांदा अनुज्ञेय करता येईल. सदर अग्रिमाची रक्कम उपरोल्लेखित फरकाइतकी **किंवा** घर दुरूस्तीचा खर्च **किंवा** ₹२१ लक्ष यापैकी जी कमी असेल ती रक्कम घर दुरूस्तीकरीता या प्रयोजनाखाली अग्रीम म्हणून अनुज्ञेय राहील.

३. घरबांधणी नियम प्रयोजनातील कोणत्याही प्रयोजनासाठी अग्रिम घेण्याकरीता **नोंदणीकृत गहाणखत** आवश्यक राहील. तसेच वैयक्तिक बंधपत्र / जामीनखत इत्यादी कागदपत्रांची आवश्यकता राहील.

४. घराच्या किंमती इतका घराचा विमा शासकीय विमा संचालनालयाकडे उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहील याची संबंधित अग्रिम धारकाने दक्षता घ्यावी.

५. पती, पत्नी दोघेही शासकीय कर्मचारी असतील त्या प्रकरणी दोघांपैकी एकालाच (विहीत मर्यादेत) घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील.

६. अर्जदार शासकीय कर्मचा-यास स्वत:च्या व प्रकरणपरत्वे त्याच्या / तिच्या पत्नीच्या / पतीच्या संयुक्त नावावर भारतात कोठेही घर / जमिन खरेदी करावयाचे असल्यास,संदर्भाधीन शासन अधिसूचना, क्र.एचबीए -१०७१/२१४३/७१/फ-१, दि.१.१.१९७२ मधील तरतूदीनुसार त्यातील अटी व शर्तींच्या अधीन कर्मचा-यास अग्रिम मंजूर करता येईल.

७. दि.१ मे, २००१ रोजी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असणाऱ्या अर्जदारास (दुसऱ्या वेळेस जुळया अपत्यांचा अपवाद वगळता) या अग्रिमाचा लाभ घेता येणार नाही.

८. अग्रिम मंजूरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे अग्रिमाची वसूली पूर्ण झाल्यानंतर या दोन्ही बाबींची नोंद सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

९. शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना घरबांधणी अग्रीम मंजूर करताना, त्याच्याकडील शिल्लक घरबांधणी अग्रीम मुद्दल व व्याजाची वसुली, त्या अधिकारी / कर्मचारी यांच्या देय सेवा निवृत्ती उपदान अथवा परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून वसूल करण्यासंदर्भात संमती पत्र देणे आवश्यक असेल. सदर संमतीपत्र घेण्याची जबाबदारी अग्रीम मंजूर करणा-या प्राधिका-याची राहील.

१०. शासन सेवेत असताना अग्रीम धारकाचा मृत्यु झाल्यास, त्याच्या मृत्युच्या दिनांकास शिल्लक असलेली व्याज रक्कमेची वसुली प्रशासकीय विभागाने सोडून दयावी. मृत्युच्या दिनांकाला शिल्लक असलेल्या मुद्दलाची पूर्ण रक्कम अग्रीम धारकाच्या मृत्यु-नि-सेवा उपदान / परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून समायोजित करण्यात यावी. समायोजनानंतरही मुद्दल शिल्लक राहिल्यास ₹१.०० लक्ष पर्यंतचीच रक्कम क्षमापित करण्यास संबंधित प्रशासकीय विभाग सक्षम राहील. त्यानंतर देखील शासकीय कर्मचाऱ्याकडून घरबांधणी अग्रिम मुद्दलाची रक्कम वसूल करावयाची शिल्लक राहिल्यास, संबंधित कर्मचाऱ्याच्या वारसदाराकडून अथवा अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्त केलेल्या वारसदाराकडून अश्या शिल्लक रकमेची वसूली करावी. अन्यथा अशा कर्मचाऱ्याचे घर / सदनिका शासनाकडे गहाण असल्याने सक्षम प्राधिकाऱ्याने सदर घर / सदनिका लिलाव करुन त्या रकमेतून शिल्लक मुद्दलाची वसुली करावी.

११. घरबांधणी अग्रिमधारकास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९, मधील नियम क्र.८ अंतर्गत शासन सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त / बडतर्फ / सेवेतून काढून टाकले असल्यास, सक्तीने सेवानिवृत्ती / बडतर्फी / सेवेतून काढून टाकल्याच्या दिनांकास त्यास देय असलेल्या शासकीय रकमांमधून वसूल करावयाची संपूर्ण शिल्लक घरबांधणी अग्रिमाची व शिल्लक व्याजाची रक्कम वसूल करण्यात यावी. यानंतरही शासकीय कर्मचाऱ्याकडून घरबांधणी अग्रिम अथवा व्याजाची रक्कम वसूल करावयाची शिल्लक राहिल्यास संबंधित कर्मचाऱ्याने शिल्लक रक्कम शासनास त्वरीत एकरकमी भरणा करावी अन्यथा अशा कर्मचाऱ्याचे घर/सदनिका शासनाकडे गहाण असल्याने सक्षम प्राधिकाऱ्याने सदर घर /सदनिका लिलाव करुन त्या रकमेतून उर्वरीत मुद्दल / व्याजाची वसूली करावी.

१२. घरबांधणी अग्रिम रकमेच्या नियमित व योग्य वसुलीसाठी अर्जदार स्वत: जबाबदार राहील.

१३. अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला / अन्य विभाग / कार्यालयात बदली झाली तरीही घरबांधणी अग्रिम तसेच शासनाकडील इतर अन्य अग्रिमांची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रिमधारक स्वत: जबाबदार राहील. याबाबत अग्रिम मंजूरीच्या आदेशात स्पष्ट उल्लेख करण्याची जबाबदारी अग्रिम मंजूरी प्राधिकाऱ्याची राहील.

१४. शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेले अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे त्या कारणाकरिता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसुरदाराकडून अग्रिमाची रक्कम प्रचलित व्याजदर + २.७५ टक्के दंडनीय व्याज यासह एकरकमी वसूल करण्यात यावी.

१५. संबंधित प्रशासकीय विभागाने निधी उपलब्धतेचे प्रमाणपत्र दिलेले असले पाहिजे.

१६. शासकीय कर्मचाऱ्यास मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रिमाच्या प्रथम हप्त्याची रक्कम वितरीत केल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने कोणत्याही कारणास्तव पुढील अग्रिम न घेता प्रथम हप्त्यात घेतलेल्या अग्रिमाची रक्कम परत करून अग्रिम रद्द करण्याची विनंती केल्यास अग्रिम मंजूरीच्या दिनांकास प्रचलित असलेल्या व्याजदराने गणना करुन रक्कम परतीच्या

दिनांकापर्यंतच्या व्याजाची वसूली करण्यात यावी. तसेच, सदर अधिकारी / कर्मचारी यांना पुन्हा घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात येऊ नये.

१७. प्रतिनियुक्तीवरील कर्मचा-यांना अग्रिम मंजूरीसंदर्भात वित्त विभागाचे परिपत्रक क्र.एफएनआर-१०७०/२०७६/एफ-१, दि.९ मे, १९७२ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

८. अग्रीम परतफेडीच्या क्षमतेची परिगणना पुढीलप्रमाणे करण्यात यावी.

| **अ.क्र.** | **उर्वरीत शासन सेवेचा कालावधी** | **अनुज्ञेय अग्रीम परिगणनेचे सूत्र** |
|---|---|---|
| १. | २० वर्षानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत. | मुळ मासिक वेतनाच्या १०० टक्के X उर्वरीत मासिक सेवा कालावधी |
| २. | १० वर्षानंतर परंतु २० वर्षांची सेवा पूर्ण होण्यापूर्वी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत. | मुळ मासिक वेतनाच्या ९० टक्के X उर्वरीत मासिक सेवा कालावधी |
| ३. | १० वर्षांच्या आत सेवानिवृत्त होणाऱ्या तथापि सेवानिवृत्तीसाठी किमान ५ वर्षे सेवा कालावधी शिल्लक असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत. | मुळ मासिक वेतनाच्या ८० टक्के X उर्वरीत मासिक सेवा कालावधी |

*** मुळ वेतनामध्ये "विशेष वेतन" इत्यादी सारख्या वेतनांचा समावेश नसेल.**

९. व्याज दराबाबत अन्य आदेश निर्गमित होईपर्यंत या आदेशान्वये ₹२५.०० लक्ष पर्यंतच्या घर बांधणी अग्रीम प्रकरणी व्याजाची परिगणना ७.९ % या दराने करावी व ₹२५.०० लक्ष वरील मंजूर अग्रीमाच्या बाबतीत मात्र संपूर्ण मंजूर अग्रिम रकमेवर व्याजाची परिगणना ९.९ % टक्के या एकरूप दराने करण्यात यावी. ज्या आर्थिक वर्षात घरबांधणी अग्रिम मंजूर केले आहे त्या वर्षासाठी जो व्याजदर लागू करण्यात आला असेल त्याच दराने संपूर्ण अग्रीम कालावधीत व्याजाची परिगणना करण्यात यावी. व्याजाची परिगणना वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अग्रिम-१०९९/प्र.क्र.४४/९९/विनियम, दि.५ मे,२००० मध्ये नमूद केलेल्या पद्धतीने करण्यात यावी.

१०. या शासन निर्णयातील सुधारीत मर्यादा सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील. तथापि, ज्या अधिकारी / कर्मचा-यांना संदर्भीय दि.२०.२.२०१५ अन्वये घर बांधणी अग्रिमाची रक्कम एकापेक्षा अधिक हप्त्यात मंजूर केली असेल व अग्रीमधारकास या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यत अग्रीमाचे सर्व हप्ते वितरीत केले नसतील अशा प्रकरणी संबंधित अग्रीम धारकास सदर शासन निर्णयानुसार विहीत सर्व अटी / शर्तींच्या अधीन अग्रीम अनुज्ञेय करता येईल. याव्यतिरिक्त यापूर्वी मंजूर करण्यात आलेली अग्रिमाची प्रकरणे पुन्हा नव्याने उघडण्यात येऊ नयेत.

११. मुंबई वित्तीय नियम, १९५९ च्या परिशिष्ट-२६ मधील घरबांधणी अग्रिम विषयक नियमांमध्ये आवश्यक सुधारणा यथावकाश करण्यात येईल. तसेच यापूर्वीच्या शासन निर्णयातील ज्या तरतूदींमध्ये या शासन निर्णयान्वये स्पष्टपणे सुधारणा करण्यात आलेल्या नाहीत त्या अबाधित राहतील.

१२.    सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०२१०२०२१५१०११७३०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6015944fe7d58a83f4a54c43147b5da1e34861e2984e9f793b66f7249aaa9c1a, pseudonym=CAD826A943AA15444490C64B66C7EE464C4AD05A, serialNumber=D4994742192306FCC1DEA9AADD3810639506519FA652B919767B98B04E905A18, cn=INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2021.02.02 15:15:03 +05'30'

**( इंद्रजित गोरे )**
शासनाचे उप सचिव

**प्रत,**

१. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२. सर्व सन्माननीय विधान परिषद / विधानसभा व संसद सदस्य,
३. मा. राज्यपाल यांचे सचिव,
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
५. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
६. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
८. मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख,
९. प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा / अपील शाखा), मुंबई,
१०. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
११. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१४. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
१५. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१८. महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई,
१९. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२०. प्रमुख न्यायाधीश, कुटुंब न्यायालय, पुणे / नागपूर / औरंगाबाद / अकोला / अमरावती / ठाणे / नाशिक / सोलापूर / मुंबई,
२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२२. सर्व विभागीय आयुक्त,
२३. सर्व जिल्हाधिकारी,
२४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२६. सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ,
२८. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकणभवन, नवी मुंबई,
२९. सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
३०. सर्व कोषागार अधिकारी,
३१. वित्त विभागातील सर्व कार्यासने,
३२. निवड नस्ती (विनियम), वित्त विभाग.

*****************

भविष्य निर्वाह निधी योजना व राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या वर्गणीदारांची वेतन देयके "सेवार्थ" प्रणालीत स्वतंत्र गट/संचाद्वारे संस्करीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.५६/कोषा प्रशा-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ९ डिसेंबर, २०२०

**प्रस्तावना**

सद्य:स्थितीत भविष्य निर्वाह निधी लागू असलेले वर्गणीदार (अधिकारी व कर्मचारी) आणि राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेले वर्गणीदार (अधिकारी व कर्मचारी) यांची वेतन देयके "सेवार्थ" प्रणालीतून एकत्रित संस्करीत करण्यात येतात. तथापि, त्यामुळे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या वर्गणीदारांचे अंशदान तसेच शासन अंशदानाची रक्कम विहित कालावधीत वर्गणीदाराच्या "प्रान" खात्यावर जमा होण्यास अडचणी येत असल्याचे दिसून येते.

२. सबब, राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या वर्गणीदाराचे अंशदान तसेच शासन अंशदानाची रक्कम विहित वेळेवर जमा होण्याच्या दृष्टीने, "सेवार्थ" प्रणालीत भविष्य निर्वाह निधी योजनेतील वर्गणीदार आणि राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनांतर्गत वर्गणीदार यांच्या वेतन देयकांचे स्वतंत्र गट/संच (Bill Group) बनवून त्यांचे वेतन आहरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्याअनुषंगाने सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना खालील सूचना देण्यात येत आहेत.

## शासन परिपत्रक

१) सद्य:स्थितीत "सेवार्थ" प्रणालीमध्ये भविष्य निर्वाह निधी योजना, राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना तसेच या दोन्हींपैकी कोणतीही योजना अद्यापही लागू नसलेले इतर कर्मचारी यांची वेतन देयके एकत्रितपणे संस्करीत करण्याची सुविधा आहे. यापुढे आहरण व संवितरण अधिकारी यांनी वेतन आहरीत करताना खाली नमूद "अ" ते "क" नुसार वेतन देयकांचे स्वतंत्र संच/गट (Bill Group) तयार करावेत. सर्व अधिकारी व कर्मचारी त्यांच्याशी संबंधित देयक संच/गटामध्ये समाविष्ट झाल्याची आहरण व संवितरण अधिकारी यांनी खात्री करावी.

अ) भविष्य निर्वाह निधी लागू असलेले अधिकारी व कर्मचारी,
ब) राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेले अधिकारी व कर्मचारी,
क) इतर कर्मचारी ज्यांना उपरोक्त दोन्हीपैकी कोणतीही योजना अद्याप लागू केलेली नाही.

२) उपरोक्त प्रमाणे स्वतंत्र देयक संच/गट "सेवार्थ" मधील "Bill Group Maintenance" या टॅबमधून तयार करावेत व सदर देयक संच/गट यामध्ये संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना जोडण्यात यावे.

३) राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा "प्रान" क्रमांक प्राप्त झाल्यानंतरच त्यांना "NPS देयक संच/गट" यामध्ये समाविष्ट करण्यात यावे. तसेच ज्या कर्मचाऱ्यांना "प्रान" क्रमांक प्राप्त झाले नाहीत अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयाशी संपर्क साधून त्वरीत "प्रान" प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी.

४) राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या अकार्यरत (Inactive) "प्रान" क्रमाकांची यादी मे.एन.एस.डी.एल. यांचेकडून जिल्हा कोषागार कार्यालयांना दरमहा पाठविली जाते. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी अकार्यरत "प्रान" क्रमांक असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी वरचेवर कोषागार कार्यालयांकडून प्राप्त करुन ते "कार्यरत" (active) करुन घ्यावेत व तदनंतरच अशा वर्गणीदाराचा वेतन देयकाच्या "NPS संच/गट" यामध्ये समावेश करावा.

५) भविष्य निर्वाह निधी योजना, राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना व गटविमा योजना लागू नसलेल्या कर्मचाऱ्यांना "स्वतंत्र देयक संच/गट" यामध्ये समाविष्ट करुन त्यांचे वेतन देयक "सेवार्थ" प्रणालीतून संस्करीत करावेत.

६) आहरण व संवितरण अधिकारी यांनी कोषागारात वेतन देयके सादर करताना सदर वेतन देयक भविष्य निर्वाह निधी योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना / इतर कर्मचाऱ्यांचे आहे हे त्या देयकावर स्पष्टपणे नमूद करावे.

**२.** उपरोक्तप्रमाणे सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी स्वंतत्र देयक संच/गट करण्याची कार्यवाही डिसेंबर, २०२० ते फेब्रुवारी, २०२१ या दरम्यान पूर्ण करावी. माहे मार्च, २०२१ (देय माहे एप्रिल,२०२१) चे उपरोक्तप्रमाणे स्वतंत्र संच/गट यामध्ये वर्गीकृत न केलेली वेतन देयके अधिदान व लेखा कार्यालय/कोषागार कार्यालयांमध्ये स्विकारण्यात येणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**३.** सदर शासन परिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२०१२०९१२०५२९४९०५ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ashok Gulab Chaudhary

Digitally signed by Ashok Gulab Chaudhary
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=92dfcb36eb3e19a8b418253e74d5703e6259839ca647379da27173dd25272748, serialNumber=3e9fa04602558ff79ec2fcb3553e7da28d75751faa9aa5aa2261d3e69f011558, cn=Ashok Gulab Chaudhary
Date: 2020.12.09 12:08:25 +05'30'

**(अशोक चौधरी)**
**कक्ष अधिकारी, वित्त विभाग**

**प्रत,**

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
२. सर्व मा. विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य
३. मा. राज्यपाल यांचे सचिव
४. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव

६. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
८. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
९. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई
१५. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१९. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२१. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२३. सर्व विभागीय आयुक्त
२४. सर्व जिल्हाधिकारी
२५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२७. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकणभवन, नवी मुंबई
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२९. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३०. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३१. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३२. निवड नस्ती/कोषा प्रशा-४

**<u>घरबांधणी अग्रिम</u>**
**अग्रीमाच्या रकमेत तसेच घराच्या किंमत मर्यादेत सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/ विनियम**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०२१

<u>वाचा :</u> १) मुंबई वित्तीय नियम, १९५९ ,परिशिष्ट-२६ ,अधिसूचना दि.२८.७.१९६२.
२) शासन निर्णय, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.२०.२.२०१५.
३) शासन निर्णय, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.१२.१०.२०१५.
४) शासन शुध्दीपत्र, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.२९.२.२०१६.
५) शासन निर्णय, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.१.२.२०१८.
६) शासन निर्णय, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.२२.३.२०१९.
७) शासन निर्णय, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.२४.४.२०१९.

**<u>प्रस्तावना -</u>**

वित्त विभाग, शासन निर्णय, दि.२०.२.२०१५ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या घरबांधणी अग्रीमाची रक्कम तसेच घराची किंमत मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. आता वित्त विभाग, शासन अधिसूचना, दि.३० जानेवारी,२०१९ अन्वये ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य शासकीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी दि.१.१.२०१६ पासून सुधारीत करण्यात आल्या आहेत. या सुधारीत वेतन श्रेणीतील मुळ वेतन, घर बांधणी अग्रीम मंजूरीकरीता विचारात घेण्याची व त्यानुषंगाने घराच्या किंमत मर्यादेत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

**१) <u>घर बांधणी अग्रिमाची कमाल मर्यादा</u> :-**

घरबांधणी विषयक विविध प्रयोजनांसाठी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना घर बांधणी अग्रिम मंजूर करण्याकरीता सातव्या वेतन आयोगानुसार मुळ वेतन विचारात घेण्यात यावे. अशा वेतनावर आधारीत घरबांधणी अग्रिम मंजूरीकरीता वित्त विभागाच्या क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५,दि.१६ डिसेंबर,२०१६ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या (तसेच त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणांनुसार) “एक्स”, “वाय” व त्या व्यतिरिक्त उर्वरीत वर्गीकरणातील शहरांमध्ये घर/ सदनिका/जमीन खरेदीसाठी सुधीरात कमाल मर्यादा पुढीलप्रमाणे असतील.

| **प्रयोजन** | **घरबांधणी अग्रिमाच्या रकमेची कमाल मर्यादा** | | |
|---|---|---|---|
| | वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५, दि.१६ डिसेंबर,२०१६ मध्ये नमूद खालील वर्गीकरणाच्या शहरांमधील घर खरेदीकरीता | | |
| | **"एक्स" वर्गीकरण** | **"वाय" वर्गीकरण** | **उर्वरीत वर्गीकरण** |
| १ | २ | ३ | ४ |
| (अ) (१) जमीन खरेदी करुन त्यावर विहित कालावधीत घर बांधणे **किंवा**<br>(२) स्वत:च्या मालकीच्या जागेवर नवीन घर बांधणे, **किंवा**<br>(३) स्वत:च्या मालकीच्या जागेवरील मोडकळीस आलेले घर पाडून नवीन घर बांधणे, **किंवा**<br>(४) बांधकाम चालू असलेले नवीन घर **किंवा** तयार नवीन घर खरेदी करणे. | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹७० लक्ष **किंवा** घराची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹५० लक्ष **किंवा** घराची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹४० लक्ष **किंवा** घराची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. |
| ब) घर बांधण्यासाठी जमीन खरेदी करणे. | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹२१ लक्ष **किंवा** जमिनीची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹१५ लक्ष **किंवा** जमिनीची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹१२ लक्ष **किंवा** जमिनीची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम |
| क) स्वत:च्या मालकीच्या राहत्या घराचे नवीन बांधकाम करुन विस्तार करणे. (अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी एकदाही अग्रिम घेतलेले नसल्यास.) | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹२१ लक्ष **किंवा** बांधकामाची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹१५ लक्ष **किंवा** बांधकामाची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹१२ लक्ष **किंवा** बांधकामाची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. |
| ड) सध्याचे राहते घर निवास योग्य करण्यासाठी असाधारण व विशेष स्वरुपाची दुरुस्ती करणे. (नैसर्गिक आपत्ती मुळे नुकसान पोहोचलेले घर पुन:निवास योग्य करण्यासाठी आवश्यक असलेली दुरुस्ती.)<br>{राहत्या घरात नवीन सोयी **किंवा** अंतर्गत सजावट करणे यासाठी अनुज्ञेय नाही.} | मुळ वेतनाच्या ५० पट **किंवा** ₹१०.५० लक्ष **किंवा** घर दुरुस्तीचा खर्च **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुळ वेतनाच्या ५० पट **किंवा** ₹७.५० लक्ष **किंवा** घर दुरुस्तीचा खर्च **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुळ वेतनाच्या ५० पट **किंवा** ₹६.०० लक्ष **किंवा** घर दुरुस्तीचा खर्च **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. |

| **प्रयोजन** | **घरबांधणी अग्रिमाच्या रकमेची कमाल मर्यादा** | | |
|---|---|---|---|
| | वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५, दि.१६ डिसेंबर,२०१६ मध्ये नमूद खालील वर्गीकरणाच्या शहरांमधील घर खरेदीकरीता | | |
| | **"एक्स" वर्गीकरण** | **"वाय" वर्गीकरण** | **उर्वरीत वर्गीकरण** |
| १ | २ | ३ | ४ |
| इ) हौसिंग डेव्हलपमेंट फायन्सास कार्पोरेशन(H.D.F.C.),राष्ट्रीयकृत बँका / सहकारी बँका, महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायन्सास कार्पोरेशन व तत्सम शासन मान्य वित्तीय संस्थाकडून घरबांधणीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी. | अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला शिल्लक असलेली कर्जाची रक्कम **किंवा** मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹७० लक्ष **किंवा** घराची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला शिल्लक असलेली कर्जाची रक्कम **किंवा** मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹५० लक्ष **किंवा** घराची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला शिल्लक असलेली कर्जाची रक्कम **किंवा** मुळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹४० लक्ष **किंवा** घराची किंमत **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. |
| फ) जुने घर विकत घेण्यासाठी | मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी (Authorised Valuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जुन्या घराची किंमत **किंवा** मूळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹७० लक्ष **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी (Authorised Valuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जुन्या घराची किंमत **किंवा** मूळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹५० लक्ष **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. | मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी (Authorised Valuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जुन्या घराची किंमत **किंवा** मूळ वेतनाच्या १०० पट **किंवा** ₹४० लक्ष **किंवा** अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी कमी असेल ती रक्कम. |

२. **घरबांधणी अग्रिम मंजूरीसाठी घराची किंमत मर्यादा:-**

वित्त विभागाच्या क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५,दि.१६ डिसेंबर,२०१६ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या "एक्स" व "वाय" या वर्गीकरणातील शहरांमध्ये नवीन बांधावयाच्या किंवा विकत घ्यावयाच्या तयार नवीन घराची / जुन्या घराची किंमत मर्यादा (जमिनीची किंमत वगळून) कमाल ₹२.०० कोटी व त्याव्यतिरिक्त अन्य ठिकाणांकरीता कमाल ₹१.०० कोटी अशी विहित करण्यात येत आहे. घर बांधणी अग्रिम मंजूरीसाठी सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांना सदर कमाल मर्यादा प्रकरणपरत्वे गुणवत्तेच्या आधारे २५ टक्केपर्यंत शिथिल करण्याचे पूर्ण अधिकार असतील. त्यावरील रकमेची प्रकरणे वित्त विभागाकडे सादर करण्यात यावीत.

३. **घरबांधणी अग्रिमाची वसुली :-**

(अ) अग्रीमाची व्याजासह वसुली अग्रीमधारकाच्या सेवानिवृत्तीपूर्वी पूर्ण होईल अशा रीतीने करण्यात यावी. उपरोक्त "**अ**", "**इ**" आणि " **फ** " येथील प्रयोजनाकरीता कमाल २० वर्षात, प्रथम १९२ मासिक हप्त्यात मुळ अग्रिम व नंतर ४८ मासिक हप्त्यात व्याज वसूल करण्यात यावे. "**ब** " , " **क** " आणि "**ड**" येथील प्रयोजनासाठी घेतलेल्या अग्रिमाची वसुली व्याजासह कमाल ९६ मासिक हप्त्यात, प्रथम ७२ मासिक हप्त्यात मुळ अग्रिम व नंतर २४ मासिक हप्त्यात व्याजाची रक्कम वसूल करण्यात यावी. अग्रिम धारक त्याच्या इच्छेनुसार कमी कालावधीत अग्रिम व व्याजाची रक्कम फेडण्यासाठी मासिक हप्त्याची रक्कम वाढवू शकेल.

अग्रीमधारकाचा सेवा कालावधी उपरोक्त नमूद कालमर्यादेपेक्षा कमी शिल्लक आहे अश्या प्रकरणी, उर्वरीत सेवा कालावधी विचारात घेऊन मुद्दल व व्याज वसुली सेवानिवृत्तीपूर्वी पूर्ण होईल या दृष्टीने मुद्दल व व्याजाचा वसुली कालावधी निश्चित करण्यात यावा.

(ब) घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकरकमी मंजूर केली असल्यास, अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाची रक्कम वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात यावी.

घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकापेक्षा अधिक हप्त्यात मंजूर केली असल्यास अग्रिमाच्या वसुलीची सुरुवात अग्रिमाचा प्रथम हप्ता वितरीत केल्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून करण्यात यावी.

४. शासकीय कर्मचाऱ्यास घर खरेदी / बांधकाम करण्यास सहाय्यभूत व्हावे यासाठी शासन निर्णय क्र.एचबीए -१०८३/सीआर ४६५/जीईएन ५, दि.१३.०६.१९८४ मधील परि. ३ मधील घराचा व्दितीय प्रभार स्वीकारण्याबाबत,सदर शासन निर्णयातील अन्य अटी व शर्तींच्या अधीन राहून, सदर घर / सदनिका यावर वित्तीय संस्थेचे कर्ज व शासन अग्रीम यांच्या टक्केवारीच्या प्रमाणानुसार प्रभार निर्माण करुन इतर वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारता येईल. कोणत्याही परिस्थितीत शासन अग्रीम रक्कम मंजूर केलेल्या प्रमाणाच्या टक्केवारीपेक्षा कमी प्रभार स्विकारणार नाही. शासन व वित्तीय संस्था या दोन्हींचा मिळून येणारा प्रभार घराच्या किंमती इतका असावा.

५. खाजगी बांधकाम व्यावसायिक (बिल्डर) ठेकेदार, कंपनी, सिडको, हुडको, म्हाडा, शासनाने मंजूर केलेल्या कोटयातून इत्यादी मार्गाने तयार सदनिका अथवा बांधकाम सुरु असलेल्या इमारतीत सदनिका खरेदी करण्यासाठी मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील परिशिष्ट-२६ मधील तरतुदीनुसार प्रकरणपरत्वे एक किंवा एका पेक्षा जास्त हप्त्यात अग्रिम अनुज्ञेय राहील.

६. शासन सेवेतील पुनर्नियुक्त माजी सैनिक असलेल्या कर्मचाऱ्याला संदर्भाधीन शासन निर्णय क्र.अग्रीम-१०९६/प्र.क्र.४/९६/विनियम, दि.२३.६.१९९७ मधील तरतूदीनुसार अग्रिम अनुज्ञेय राहील.

७. <u>अग्रिम मंजूरीसाठी पुढीलप्रमाणे अटी लागु राहतील</u>:-

१. ज्यांना घरबांधणी अग्रीम मंजूर करावयाचे आहे, अशा अधिकारी/कर्मचाऱ्याची शासनाच्या सेवेतील नियुक्ती संबंधित पदाच्या सेवाभरती नियमानुसार करण्यात आलेली असली पाहिजे आणि अशा प्रकारे करण्यात आलेल्या नियुक्तीनंतर कमीत कमी ५ वर्षांची सेवा झाली असली पाहिजे. त्याचप्रमाणे अग्रिम मंजूर करतेवेळी अधिकारी / कर्मचारी यांची किमान ५ वर्ष सेवा शिल्लक असणे अनिवार्य आहे.

२. वरील सर्व प्रयोजनार्थ संपूर्ण शासकीय सेवेमध्ये फक्त एकदाच अग्रिम अनुज्ञेय होईल. मात्र, शासनाकडून अग्रिम घेऊन बांधलेल्या / खरेदी केलेल्या घराच्या **नैसर्गिक आपत्तीतून उद्भवलेल्या** दुरुस्तीकरता पहिल्यांदा मंजूर झालेले अग्रिम व या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय होणारे घरबांधणी अग्रिम यामधील फरकाएवढी रक्कम घरबांधणी अग्रीम म्हणून दुसऱ्यांदा अनुज्ञेय करता येईल. सदर अग्रिमाची रक्कम उपरोल्लेखित फरकाइतकी **किंवा** घर दुरूस्तीचा खर्च **किंवा** ₹२१ लक्ष यापैकी जी कमी असेल ती रक्कम घर दुरूस्तीकरीता या प्रयोजनाखाली अग्रीम म्हणून अनुज्ञेय राहील.

३. घरबांधणी नियम प्रयोजनातील कोणत्याही प्रयोजनासाठी अग्रिम घेण्याकरीता **नोंदणीकृत गहाणखत** आवश्यक राहील. तसेच वैयक्तिक बंधपत्र / जामीनखत इत्यादी कागदपत्रांची आवश्यकता राहील.

४. घराच्या किंमती इतका घराचा विमा शासकीय विमा संचालनालयाकडे उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहील याची संबंधित अग्रिम धारकाने दक्षता घ्यावी.

५. पती, पत्नी दोघेही शासकीय कर्मचारी असतील त्या प्रकरणी दोघांपैकी एकालाच (विहीत मर्यादेत) घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील.

६. अर्जदार शासकीय कर्मचा-यास स्वत:च्या व प्रकरणपरत्वे त्याच्या / तिच्या पत्नीच्या / पतीच्या संयुक्त नावावर भारतात कोठेही घर / जमिन खरेदी करावयाचे असल्यास,संदर्भाधीन शासन अधिसूचना, क्र.एचबीए -१०७१/२१४३/७१/फ-१, दि.१.१.१९७२ मधील तरतूदीनुसार त्यातील अटी व शर्तींच्या अधीन कर्मचा-यास अग्रिम मंजूर करता येईल.

७. दि.१ मे, २००१ रोजी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असणाऱ्या अर्जदारास (दुसऱ्या वेळेस जुळया अपत्यांचा अपवाद वगळता) या अग्रिमाचा लाभ घेता येणार नाही.

८. अग्रिम मंजूरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे अग्रिमाची वसूली पूर्ण झाल्यानंतर या दोन्ही बाबींची नोंद सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

९. शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना घरबांधणी अग्रीम मंजूर करताना, त्याच्याकडील शिल्लक घरबांधणी अग्रीम मुद्दल व व्याजाची वसुली, त्या अधिकारी / कर्मचारी यांच्या देय सेवा निवृत्ती उपदान अथवा परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून वसूल करण्यासंदर्भात संमती पत्र देणे आवश्यक असेल. सदर संमतीपत्र घेण्याची जबाबदारी अग्रीम मंजूर करणा-या प्राधिका-याची राहील.

१०. शासन सेवेत असताना अग्रीम धारकाचा मृत्यु झाल्यास, त्याच्या मृत्युच्या दिनांकास शिल्लक असलेली व्याज रक्कमेची वसुली प्रशासकीय विभागाने सोडून दयावी. मृत्युच्या दिनांकाला शिल्लक असलेल्या मुद्दलाची पूर्ण रक्कम अग्रीम धारकाच्या मृत्यु-नि-सेवा उपदान / परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून समायोजित करण्यात यावी. समायोजनानंतरही मुद्दल शिल्लक राहिल्यास ₹१.०० लक्ष पर्यंतचीच रक्कम क्षमापित करण्यास संबंधित प्रशासकीय विभाग सक्षम राहील. त्यानंतर देखील शासकीय कर्मचाऱ्याकडून घरबांधणी अग्रिम मुद्दलाची रक्कम वसूल करावयाची शिल्लक राहिल्यास, संबंधित कर्मचाऱ्याच्या वारसदाराकडून अथवा अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्त केलेल्या वारसदाराकडून अश्या शिल्लक रकमेची वसूली करावी. अन्यथा अशा कर्मचाऱ्याचे घर / सदनिका शासनाकडे गहाण असल्याने सक्षम प्राधिकाऱ्याने सदर घर / सदनिका लिलाव करुन त्या रकमेतून शिल्लक मुद्दलाची वसुली करावी.

११. घरबांधणी अग्रिमधारकास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९, मधील नियम क्र.८ अंतर्गत शासन सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त / बडतर्फ / सेवेतून काढून टाकले असल्यास, सक्तीने सेवानिवृत्ती / बडतर्फी / सेवेतून काढून टाकल्याच्या दिनांकास त्यास देय असलेल्या शासकीय रकमांमधून वसूल करावयाची संपूर्ण शिल्लक घरबांधणी अग्रिमाची व शिल्लक व्याजाची रक्कम वसूल करण्यात यावी. यानंतरही शासकीय कर्मचाऱ्याकडून घरबांधणी अग्रिम अथवा व्याजाची रक्कम वसूल करावयाची शिल्लक राहिल्यास संबंधित कर्मचाऱ्याने शिल्लक रक्कम शासनास त्वरीत एकरकमी भरणा करावी अन्यथा अशा कर्मचाऱ्याचे घर/सदनिका शासनाकडे गहाण असल्याने सक्षम प्राधिकाऱ्याने सदर घर /सदनिका लिलाव करुन त्या रकमेतून उर्वरीत मुद्दल / व्याजाची वसूली करावी.

१२. घरबांधणी अग्रिम रकमेच्या नियमित व योग्य वसुलीसाठी अर्जदार स्वत: जबाबदार राहील.

१३. अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला / अन्य विभाग / कार्यालयात बदली झाली तरीही घरबांधणी अग्रिम तसेच शासनाकडील इतर अन्य अग्रिमांची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रिमधारक स्वत: जबाबदार राहील. याबाबत अग्रिम मंजूरीच्या आदेशात स्पष्ट उल्लेख करण्याची जबाबदारी अग्रिम मंजूरी प्राधिकाऱ्याची राहील.

१४. शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेले अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे त्या कारणाकरिता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसुरदाराकडून अग्रिमाची रक्कम प्रचलित व्याजदर + २.७५ टक्के दंडनीय व्याज यासह एकरकमी वसूल करण्यात यावी.

१५. संबंधित प्रशासकीय विभागाने निधी उपलब्धतेचे प्रमाणपत्र दिलेले असले पाहिजे.

१६. शासकीय कर्मचाऱ्यास मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रिमाच्या प्रथम हप्त्याची रक्कम वितरीत केल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने कोणत्याही कारणास्तव पुढील अग्रिम न घेता प्रथम हप्त्यात घेतलेल्या अग्रिमाची रक्कम परत करून अग्रिम रद्द करण्याची विनंती केल्यास अग्रिम मंजूरीच्या दिनांकास प्रचलित असलेल्या व्याजदराने गणना करुन रक्कम परतीच्या

दिनांकापर्यंतच्या व्याजाची वसूली करण्यात यावी.  तसेच, सदर अधिकारी / कर्मचारी यांना पुन्हा घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात येऊ नये.

१७.   प्रतिनियुक्तीवरील कर्मचा-यांना अग्रिम मंजूरीसंदर्भात वित्त विभागाचे परिपत्रक क्र.एफएनआर-१०७०/२०७६/एफ-१, दि.९ मे, १९७२ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

८.   अग्रीम परतफेडीच्या क्षमतेची परिगणना पुढीलप्रमाणे करण्यात यावी.

| **अ.क्र.** | **उर्वरीत शासन सेवेचा कालावधी** | **अनुज्ञेय अग्रीम परिगणनेचे सूत्र** |
|---|---|---|
| १. | २० वर्षानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत. | मुळ मासिक वेतनाच्या १०० टक्के X उर्वरीत मासिक सेवा कालावधी |
| २. | १० वर्षानंतर परंतु २० वर्षांची सेवा पूर्ण होण्यापूर्वी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत. | मुळ मासिक वेतनाच्या ९० टक्के X उर्वरीत मासिक सेवा कालावधी |
| ३. | १० वर्षांच्या आत सेवानिवृत्त होणाऱ्या तथापि सेवानिवृत्तीसाठी किमान ५ वर्षे सेवा कालावधी शिल्लक असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत. | मुळ मासिक वेतनाच्या ८० टक्के X उर्वरीत मासिक सेवा कालावधी |

*** मुळ वेतनामध्ये "विशेष वेतन" इत्यादी सारख्या वेतनांचा समावेश नसेल.**

९.   व्याज दराबाबत अन्य आदेश निर्गमित होईपर्यंत या आदेशान्वये ₹२५.०० लक्ष पर्यंतच्या घर बांधणी अग्रीम प्रकरणी व्याजाची परिगणना ७.९ % या दराने करावी व ₹२५.०० लक्ष वरील मंजूर अग्रीमाच्या बाबतीत मात्र संपूर्ण मंजूर अग्रिम रकमेवर व्याजाची परिगणना ९.९ % टक्के या एकरूप दराने करण्यात यावी. ज्या आर्थिक वर्षात घरबांधणी अग्रिम मंजूर केले आहे त्या वर्षासाठी जो व्याजदर लागू करण्यात आला असेल त्याच दराने संपूर्ण अग्रीम कालावधीत व्याजाची परिगणना करण्यात यावी. व्याजाची परिगणना वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अग्रिम-१०९९/प्र.क्र.४४/९९/विनियम, दि.५ मे,२००० मध्ये नमूद केलेल्या पद्धतीने करण्यात यावी.

१०.   या शासन निर्णयातील सुधारीत मर्यादा सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील. तथापि, ज्या अधिकारी / कर्मचा-यांना संदर्भीय दि.२०.२.२०१५ अन्वये घर बांधणी अग्रिमाची रक्कम एकापेक्षा अधिक हप्त्यात मंजूर केली असेल व अग्रीमधारकास  या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यत अग्रीमाचे सर्व हप्ते वितरीत केले नसतील अशा प्रकरणी संबंधित अग्रीम धारकास सदर शासन निर्णयानुसार विहीत सर्व अटी / शर्तींच्या अधीन अग्रीम अनुज्ञेय करता येईल. याव्यतिरिक्त यापूर्वी मंजूर करण्यात आलेली अग्रिमाची प्रकरणे पुन्हा नव्याने उघडण्यात येऊ नयेत.

११.   मुंबई वित्तीय नियम, १९५९ च्या परिशिष्ट-२६ मधील घरबांधणी अग्रिम विषयक नियमांमध्ये आवश्यक सुधारणा यथावकाश करण्यात येईल. तसेच यापूर्वीच्या शासन निर्णयातील ज्या तरतूदींमध्ये या शासन निर्णयान्वये  स्पष्टपणे सुधारणा करण्यात आलेल्या नाहीत  त्या अबाधित राहतील.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०२१०२०२१५१०११७३०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6015944fe7d58a83f4a54c43147b5da1e34861e2984e9f793b66f7249aaa9c1a, pseudonym=CAD826A943AA15444490C64B66C7EE464C4AD05A, serialNumber=D4994742192306FCC1DEA9AADD3810639506519FA652B919767B98B04E905A18, cn=INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2021.02.02 15:15:03 +05'30'

**( इंद्रजित गोरे )**
शासनाचे उप सचिव

**प्रत,**

१. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२. सर्व सन्माननीय विधान परिषद / विधानसभा व संसद सदस्य,
३. मा. राज्यपाल यांचे सचिव,
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
५. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
६. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
८. मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख,
९. प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा / अपील शाखा), मुंबई,
१०. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
११. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१४. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
१५. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१८. महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई,
१९. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२०. प्रमुख न्यायाधीश, कुटुंब न्यायालय, पुणे / नागपूर / औरंगाबाद / अकोला / अमरावती / ठाणे / नाशिक / सोलापूर / मुंबई,
२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२२. सर्व विभागीय आयुक्त,
२३. सर्व जिल्हाधिकारी,
२४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२६. सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ,
२८. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकणभवन, नवी मुंबई,
२९. सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
३०. सर्व कोषागार अधिकारी,
३१. वित्त विभागातील सर्व कार्यासने,
३२. निवड नस्ती (विनियम), वित्त विभाग.

*****************